भाई माधवराव बागल एक राजकीय अभ्यास

प्रकरण - तिसरे

# कामगार चळवळ

## प्रकरण तिसरे

## का म गा र   च ळ व ळ

कोल्हापूर संस्थानात खंडेराव बागलांनी " हंटर " वृत्तपत्र सुरु करुन त्यातून सामाजिक, राजकीय प्रश्नावर प्रबोधन करण्याचे कार्य सुरु केलेले होते. माधवराव बागल आपले जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् मधील शिक्षण पूर्ण करुन कोल्हापूरात परत आल्यानंतर कला क्षेत्रातच पूर्णवेळ काम करण्याची त्यांना संधी दिसत नव्हती. भटकत राहणे व त्यातून थोडयाशा चित्रकलेत रममान होणे हा त्यांचा कार्यक्रम होता. १९३० च्या दरम्यान खंडेराव बागलांची तब्येत ठीक नसल्यामुळे माधवराव " हंटर " च्या कामात लक्ष देवू लागले होते. स्फुट लिहणे, शुध्द लेखन तपासणे, लेखांचे संपादन करणे आदी कामे त्यांनी केली होती. प्रेसच्या कामानिमित्ताने त्यांचा संपर्क वाढत गेला. यातूनच विविध प्रश्नांच्या संदर्भात चिंतन व लिखान सुरु करुन बागलांनी चळवळी उभ्या करण्यापर्यन्त वाटचाल केली.

छापखान्यास कोल्हापूरातील शाहू मिलचे काम मिळत होते. त्यामुळे माधवराव वारंवार मिलमध्ये जात असत. मिलमधील कामगारांच्या अडचणीकडे बागलांचे लक्ष जावू लागले. त्यांनी कामगारांना भेटून त्यांच्या प्रश्नासंबंधी सविस्तर माहिती जमा करण्यास सुरुवात केली. या काळात कामगाराना दैनंदिन ११ ते १२ तास काम करुन फक्त ९ ते १० रुपयापर्यन्तच वेतन मिळत होते. कामगारांच्या प्रश्नासंबंधीचे लिखान हंटर मधून बागलांनी सुरु केले. खालसा मुलखाप्रमाणे संस्थानात " फॅक्टरी ॲक्ट" लागू करुन कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला देण्यात यावा

....

अशी मागणी बागलांनी आपल्या वृत्तपत्रातून केली. संस्थानात संघटना व सभा बंदी असल्यामुळे त्यांना त्वरीत संघटना बांधणी करता आली नाही. म्हणून ऑगष्ट १९३० मध्ये "हंटर" वृत्तपत्रातून त्यांनी फॅक्टरी ॲक्टची मागणी केली. त्याचबरोबर जबाबदार शासन पध्दती व संघटना स्वातंत्र्यांची मागणी त्यांनी संस्थानकडे करुन आपल्या चळवळीस प्रारंभ केला.

या काळातील लेख आक्षेपार्ह ठरवून दरबारचे दिवाण सुर्वे यांनी हंटर वृत्तपत्राला धडा शिकविण्यासाठी ५ हजार रुपयाच्या जामिनाची मागणी व बागलांच्या हद्दपारीचा वटहुकूम १७.९.१९३० रोजी काढला. खंडेराव बागलांनी जामीनाची रक्कम भरण्यास नकार देवून हंटर बंद केले व माधवराव हद्दपारीमुळे पुणे-मुंबईस निघून गेले. यानंतर प्रजा परिषदेच्या स्थापनेनंतर बागलांना अटक होवून शिक्षा झाल्यानंतर डिसेंबर १९४१ पर्यन्त संस्थानातील कोणत्याही चळवळी सातत्याने टिकवल्या गेल्या नाहीत. चळवळीचे वातारणच संपले होते.[१]

कोल्हापूर संस्थानच्या गादीवर ताराबाई महाराज आल्यानंतर १८ डिसेंबर १९४० रोजी शिक्षा पूर्ण होण्या अगोदरच माधवराव बागलांची सुटका करण्यांत आली. यानंतर १९४१ मध्ये माधवराव बागलांनी शाहू मिल मजूर संघटनेची स्थापना करुन अध्यक्षपदी माधवराव बागल व चिटणीस पदी विश्वासराव पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यांत आली. कामगार संघटनेच्या कार्याची सखोल माहिती मिळावी म्हणून संघटनेच्या वतीने विश्वासराव पाटील व राम घोरपडे यांना अहमदाबादला पाठवून प्रशिक्षण घेवून येण्यास सांगितले. चळवळीच्या दृष्टीने ते उपयोगाचेच ठरले.[२] शाहु मिल कामगार संघटना स्थापन होण्यापूर्वी बागल कारागृहात असताना त्यांनी मार्क्सवादाचा व

.....

गांधीवादाचा सैध्दांतिक अभ्यास केल्यामुळे त्यांची वैचारिक भूमिका मार्क्सवादी गांधीवादी विचाराकडे आकर्षित झालेली होती. त्यामधूनच कष्टकरी जनतेची संघटना करणे व परिवर्तनाची चळवळ पुढे नेण्याची त्यांची जिद्द वाढली. त्यातूनच त्यांनी संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

दुस-या महायुध्दाच्या काळात महागाईत वाढ झालेली होती. महागाईच्यामानाने संस्थानातील कामगारांचे वेतन फारच अत्यल्प होते. इतर सोयी सवलती मिळत नव्हत्या. १९४४ ते १९४७ या चार वर्षांच्या कालखंडात बागलांनी सनदशिर गांधीवादी मार्गाने अर्ज, सत्याग्रह, उपोषण, मोर्चे, संप यांचा अवलंब करून शाहु मिल, शुगर मिल, सिनेमा कामगार, शिरगांवकर मिल, दरबारी कारकून येथील कामगारांना पगार वाढ, बोनस, महागाई भत्ता मिळवून देण्यांत यश प्राप्त केले. चळवळीत साततत्याने हिंसक मार्गाचा त्यांनी त्याग केला. याच काळात म्हणजे २६ मार्च १९४४ रोजी कोल्हापूर " राष्ट्रीय कामगार सभा " स्थापन केली. या संघटनेच्या मागणीवरूनच कोल्हापूर संस्थानांत ११ मे १९४४ मध्ये फॅक्टरी ॲक्ट व ऑक्टोबर १९४७ मध्ये गुमास्ता कायदा दरबारने लागू केला. संघटनेच्यावतीने किमान जीवन वेतनाची मागणी साततत्याने करण्यांत आली. संस्थानात शेतकरी कामगारांचे राज्य स्थापन करण्यासाठी प्रजा परिषदेच्या जबाबदार शासन पध्दतीच्या मागणीस व कॉंग्रेसच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीस सहकार्य करण्याचा निर्णय कामगार संघाने घेतला होता.[3]

.....

माधवराव बागलांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर संस्थान व परिसरात चाललेल्या कामगार चळवळीतील महत्वाच्या चळवळीचा तपशिलवार आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल. यात शाहु मिल कामगार, शुगर मिल कामगार, सिनेमा व शिंपी कामगार या चळवळींचा प्रमुख सहभाग आहे.

## शाहु मिल कामगार :

कामगारांच्या चळवळीतून वेतनवाढ, बोनस, महागाई भत्ता हे मिळवून देत असताना इतर प्रश्नांच्या संदर्भात देखील कामगारांनी पुढाकार घ्यावा ही भूमिका माधवराव बागलांनी वारंवार घेतलेली होती. म्हणून रूग्णालयासारख्या अत्यावश्यक सेवेची गरज लक्षात घेवून शाहू मिल कामगार संघाने स्वत:च्या वर्गणीतून रूग्णालय सुरू करण्याचा निर्णय २० जानेवारी १९४४ रोजी घेवून व ती योजना प्रत्यक्षात अंमलात आणली.[४]

## बोनस व महागाई भत्ता मागणी :

शाहू मिल कामगार संघाची स्थापना झाल्यानंतर संघटनेची ६ मार्च १९४४ रोजी माधवराव बागलांच्या अध्यक्षतेखाली बैठक होवून पुढील मागण्यांचे ठराव संमत करण्यांत आले.

१. कामगारांना गिरणीतूनच धान्य, रॉकेल आदी अत्यावश्यक वस्तू देण्याची व्यवस्था करावी.

२. प्रत्येक दिवसाला एक रूपयाप्रमाणे महिन्याला तीस रूपये प्रत्येकी महागाई भत्ता देण्यात यावा. सध्या तो सात आणेच मिळतो.

३. तीन महिन्याच्या पगारा एवढा बोनस देण्यात यावा.

.....

या बैठकीत संमत झालेले ठराव दरबाराकडे पाठविण्यात आले व कामगारानी दारू पिऊ नये असेही आवाहन या बैठकीत बागलांनी केले होते.[5]

वरील मागण्यांचे निवेदन दरबाराकडे गेल्यानंतर डिसेंबर १९४४ मध्ये दरबारने महागाई भत्त्याची व बोनसची मागणी अंशत: मान्य केली. पण अत्यल्प मागणी मान्य नसल्यामुळे पुन्हा संघटनेने फेरविचार करण्याची विनंती दरबारास केली. या मागणीसाठी दोन दिवस अन्न सत्याग्रह करण्याची घोषणा बागलांनी केली होती. पण दरबारच्या विनंतीवरून त्यांनी उपोषण करण्याचे परत घेतले. पुन्हा बागलांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन महागाई भत्ता महिना तीस रुपये व तीन महिन्याच्या वेतनाऐवढे बोनस या मागण्यासंबंधीचे ठराव संमत केले.[६]

## अन्न सत्याग्रहाची घोषणा :

दरबाराकडे केलेल्या मागण्या मान्य न झाल्यामुळे शाहू मिल कामगार संघाचे अध्यक्ष माधवराव बागल यांनी ३ जुलै १९४४ रोजी अन्न सत्याग्रह करण्याचा कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमाचा तपशिल जाहीर करून बागलांनी हे अंतिम उपाय म्हणून आम्ही करीत आहोत असे पत्रकात नमूद केले होते.[७] या आंदोलनातील मागण्यासाठी इतर कामगार संघटनानी आपला सक्रीय पाठिंबा जाहीर केला होता.

कोल्हापूरातील हरिजन सेवक संघाची २९ जून १९४४ रोजी डॉ. आप्पासाहेब यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होवून शाहू मिल कामगारांनी संप पुकारला तर सक्रीय मदत करण्याचा ठराव संमत करण्यांत आला होता.

मेकॅनिकल वर्कशॉप कामगार संघाचीही माधवराव बागलांच्या

.....

अध्यक्षतेखाली १ जुलै १९४४ रोजी बैठक होवून या आंदोलनास आपल्या शक्तीनुसार मदत करण्याचे आश्वासन देण्यांत आले. इचलकरंजी मजूर संघाचे सेक्रेटरी गोलगडे यांनी बागलांची भेट घेवून या आंदोलनास आपला पाठिंबा जाहीर केला होता.[८] या आंदोलनाचे वातावरण बनत चालले आहे व इतर कामगार संघटनाही या आंदोलनात सहभागी होऊ लागल्या आहेत असे चित्र दिसू लागल्यानंतर संस्थानचे पंतप्रधान मिचेल यांनी बोनस व महागाई भत्ता या मागण्यांच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन दिल्यानंतर या अन्न सत्याग्रहाचा कार्यक्रम स्थगित करण्यांत आला.[९] अन्न सत्याग्रहाचा कार्यक्रम स्थगित केल्यानंतर ऑगष्टच्या दुस-या आठवडयात दरबाराने प्रतिदिनास सात पैसे महागाई भत्यात वाढ जाहिर केली यामुळे वाढ मिळूनही कामगारांत नाराजीचे वातावरणच पसरले. कारण प्रति दिनास एक रुपाया अशी संघटनेची मागणी होती. [१०]

दरबारने सात पैसे वाढ केल्यानंतर माधवराव बागलानी पंतप्रधान मिचले यांना पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केली होती. मजूरांना महीना दोन रुपये चौदा आणे एवढा महागाई भत्ता मिळतो. आम्ही संप करु इच्छीत नाही. पण आपण या मागणीचा पुर्नविचार करावा असे या पत्रात नमूद करण्यात आले होते. [११] यानंतर शाहु मि मिल कामगार संघाची सभा ३० ऑक्टोबर ४४ रोजी माधवराव बागलांच्या अध्यक्षतेखाली होऊन पुढील ठराव संमत करण्यात आला होता. शाहू मिल मजूरांच्या महागाई भत्यात जी वाढ काण्यात आली आहे ती अपूरी आहे तरी दरबाराने या मागणीचा फेरविचार करुन महिना तीस रुपाया महागाई भत्ता व तीन महीन्याच्या पगारा एवढा बोनस द्यावा. [१२] या मागणी नंतर " ज्युडिशियल मिनिष्टर व कामगार अधिकारी यांनी शाहू मिल

.....

कामगारांच्या मागण्याचा विचार करून दोन महीने पगारा एवढा बोनस देण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयाचे बागलांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ३०-१२-४४ च्या बैठकीत स्वागत करण्यात आले. अशा प्रकारे बागलानें आपल्या मागण्या पूर्णत: नसल्यातरी पण काही भाग तरी मिळविण्यात या लढयात यश प्राप्त केले.

कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय :

कामगार सभेची स्थापना :

मार्च १९४४ च्या दरम्यान कोल्हापूर संस्थानात शाहू मिल, शुगर मिल, सिनेमा कामगार या संघटनाच्यावतीने पगार वाढ, बोनस हंगामी कामगारांचा प्रश्न या प्रश्नावर लढे सुरु झालेले होते. एखादी कामगार संघटना संपावर असेल तर तिला इतर संघटनाचे सहकार्य व मदत लढा यशस्वी होण्यासाठी व कामगारांची शक्ती एकसंघ करण्यासाठी अवश्यक आहे म्हणून सर्व कामगार संघटनाची एक शिखार कामगार संघटना स्थापन करण्याचे माधवराव बागलानें निश्चित केले.

या कारणासाठी संस्थानातील सिनेमागृह कामगार, शुगर मिल, शाहु मिल, शिंपी, प्रेस कामगार, व्यापारी नोकर संघ, यातील प्रमुख नेत्यांची एक बैठक २६ मार्च ४४ रोजी माधवराव बागलांनी आयोजित करून त्यात कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार संघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या संघाच्या अध्यक्षपदी माधवराव बागलांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या संघटनेच्या स्वरूपासंबंधी बोलताना बागलाने सांगितले की, प्रत्येक संघटनेचे अस्तित्व स्वतंत्र राहील पण एका संघटनेचा

......

संप सुरू झाला तर इतरांनी त्यांच्या मदतीसाठी धावून जावे यासाठीच संघाची स्थापना करण्यात आली.आहे. लवकरच या संघाची बैठक घेवून कामगार विषयक व्यापक धोरण निश्चित करण्यात येईल असे या बैठकीत जाहीर करण्यात आले. [१४]

सभेच्या स्थापनेवेळी निश्चित केल्याप्रमाणे अवघ्या पाचच दिवसानंतर संस्थान राष्ट्रीय कामगार सभेची बैठक १ एप्रील ४४ रोजी राजाराम सिनेमा गृहात माधवराव बागलांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत बोलतांना बागलानी पुढील प्रश्नासंबंधी विवेचन केले. कोल्हापूर संस्थानात अद्याप खालसात चालू असलेला फॅक्टरी कायदा, गुमास्ता कायदा लागू करण्यात आलेला नाही. किमान व जीवन वेतन मिळत नाही यासाठी आपण हे संघटन करीत आहोत.

या बैठकीत सभेचे उपाध्यक्ष व सेक्रेटरी म्हणून अनुक्रमे रुईकर व माधवराव भोसले यांची निवड करण्यात आली. या बैठकीत पुढील ठराव संमत करण्यात आले.

१. कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार सभा मुंबई इलाख्यात चालू असलेला फॅक्टरी अॅक्ट येथील परिस्थितीला अनुसरून दुरुस्ति करून व गुमास्ता कायदा संस्थानाने त्वरीत लागू करावा असा आग्रह धरीत आहे.

२. कोल्हापूरात किमान वेतन व जीवन वेतन कामगारांना त्वरीत देण्यात यावे.

३. सराफांनी शनिवारी व अमावश्याच्या दिवशी सुट्टी देण्याचे ठरविले आहे. त्याचे ही सभा अभिनंदन करीत आहे. पण दररोज ८ वाजता दुकाने बंद करणे,.जीवन वेतन, नोकरीची शाश्वती, प्राव्हीडंट फंड, बोनस यांना मान्यता देवून इतरांच्या पुढे आदर्श निर्माण करावा अशी सभेची मागणी आहे.

.....

४. मजूर हा जनतेतील बहुसंख्य वर्ग आहे. राजकीय धोरणांचा त्यांच्यावर विशेष परिणाम होतो. म्हणून कोल्हापूर सरकारने घोषीत केलेले कायदे मंडळ अत्यंत प्रतिगामी स्वरूपाचे असल्यामुळे त्याचा कामगार सभा धिक्कार करीत असून सर्वांनीच त्या कायदे मंडळावर बहिष्कार घालावा अशी इच्छा प्रदर्शित करीत आहे.[१५]

कामगार सभेची स्थापना झाल्यानंतर कामगारां संघटीत करण्यात यश मिळून पुढील कालावधित शाहू मिल, शुगर मिल, सिनेमा गृह कामगार यांच्या मागण्या काही प्रमाणात मान्य करून घेण्यात यश मिळाले.

## फॅक्टरी ॲक्ट मान्य :

संस्थान कामगार सभेची स्थापना झाल्यानंतर अवघ्या दीड महिन्याच्या कालावधीत संस्थानात दिनांक ११ मे ४४ रोजी फॅक्टरी ॲक्ट लागू केल्याची दरबारने घोषणा केली. या कायद्याप्रमाणे मिल कामगाराचे कामाचे तास ९ करण्यात आले. पुर्वी १२ तासापर्यंत काम कराव लागत होते. या कायद्याची घोषणा झाल्यानंतर बागलाने संस्थानिकाचे अभिनंदन करणारे पत्रक प्रसिध्द केले होते.

## गुमास्ता कायदा :

कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार संघटनेची दुसरी महत्त्वाची मागणी संस्थानात गुमास्ता कायदा लागू करावा यासाठी दि. ९ जून १९४५ रोजी बागलांनी सभा घेवून गुमास्ता मागणी दिन साजरा केला.[१६] यानंतर अल्पावधितच करवीर कायदे मंडळाने ११ ऑक्टोबर ४५ रोजी गुमास्ता कायदा संमत करून संघटनेची दुसरीही मागणी मान्य केली.[१७]

## कामगार व राजकारणा संबंधी भूमिका :

......

२६ मार्च १९४४ रोजी कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार तर्फेची स्थापणा झाल्यानंतर दि. १ एप्रील ४४ च्या संघटनेच्या बैठकीत १३ मे १९४४ रोजी होणाऱ्या करवीर संस्थान विधीमंडळाच्या निवडणूकीवर कामगारांनी बहिष्कार टाकण्याचा ठराव संमत झाल्यानंतर कोल्हापूरात बागल स्वत:च्या राजकारणासाठी उपयोग करतात अशी टीका त्यांच्यात विरोधाकांनी सुरु केली. याच काळात भाई यादव यांनी पत्रक काढून " भाई बागल राजकारणासाठी कामगारांना बनवू नका" असे आवाहन केले होते. या आवाहनाच्या उत्तरात बागलांनी कामगारांच्या राजकारणाचे समर्थन केले. कारण बागल व प्रजा परिषदेचे मुख्य ध्येय जबाबदार शासन पध्दती स्थापन करुन शेतकरी - कामगार राज्य स्थापन करणे हे होते त्यामुळे कामगाराचे राजकीय प्रशिक्षण होणे त्यांना महत्वाचे वाटत होते.

या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना माधवराव बागल म्हणाले की, शेतकरी व कामगार राजकीय दृष्टया जागृत झाले पाहीजेत त्यांची संख्या मोठी आहे. या विभागातील प्रतिनिधी कायदे मंडळात गेले पाहिजेत. त्यांच्या हाती राजसत्ता असल्याशिवाय त्यांना चांगले दिवस येणार नाहीत. आजच्या राज्य कारभारात मजूराचे प्राबल्य असते तर फॅक्टरी ॲक्ट करा. गुमास्ता कायदा करा, वेतन व महागाई, भत्ता, बोनस द्या अशी मागणी करावी लागली नसती. मजूरांच्या हाती सत्ता असती तर कायदयाच्या हुकमाने स्वत:च्या पाहिजे त्या गोष्टी करुन घेता आल्या असत्या. मजूरांना राजकीय हक्काची जाणीव करुन देणे, स्वराज्याचे ध्येय त्यांच्यासमोर ठेवणे, भावी काळ तुमचा आहे. त्यांच्या हाती राज्यसत्ता मिळवून देण्याचा आहे म्हणून सांगणे यात राजकीय डाव आहे. भांडवलाचा राजकीय डोलारा फोडून टाकण्याचा आहे.

......

त्यात वाईट आहे पण ते मजूरांना नव्हे तर भांडवलदारांना त्याचे त्यातच मरण आहे. आज सर्व मजूरांना, शेतक-यांना आडाणीपणातून जागे करणे हे मजूर सेवकाचे पहिले व महत्वाचे कर्तव्य आहे. १८

कामगार संघटनाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवून कामगारांना कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासद होता येईल अशी भूमिका बागलाने मांडली होती. प्रेस कामगारांच्या वार्षीक सभेत ७ जानेवारी ४५ रोजी अध्यक्ष पदावरुन बोलतांना बागल म्हणाले की, मालक कामगारांची पिळवणूक करतो. युध्दामुळे महागाई वाढली. कामगार वर्गात असंतोष निर्माण झाला. त्याचा फायदा काही संस्थानी कामगारांना आपल्या गोटात ओढण्यासाठी सुरु केला आहे. त्याचे ध्येय शेतकरी- कामगार राज्य नाही. कामगार संघटनानी कोणत्याही राजकीय पक्षात सहभागी होवू नये म्हणून मी कामगार संघटना प्रजा परिषदेपासून वेगळे ठेवले. पण कामगार संघटनातील मजूरांना कोणत्याही पक्षात व्यक्तीगत पातळीवर सहभागी होता येईल. मी मात्र व्यक्तीशः त्यांना प्रजा परिषदेचा सभासद होण्यास सांगेन दोन्ही संघटनेची ध्येय शेतकरी-कामगार राज्य स्थापन करण्याचीच आहेत. कामगार संघटनातील नेत्यांनी कामगारांना त्यांच्या चळवळीचा आजचा हेतू ~~किमान~~ व अंतिम ध्येय समजावून सांगितले पाहिजे. आजचा हेतू किमान जीवन वेतन मिळविणे हा असून अंतिम ध्येय मजूर-मालक भेद नष्ट करावयाचा आहे. संघटनेतूनच आर्थिक सत्ता स्थापन करावयाची आहे. निव्वळ भाकरी ~~कि~~ मिळविणे एवढाच नाही.

उद्योग धंदे समाजाच्या मालकीचे आहेत. याचा सरळ अर्थ त्याची मालकी आज मालक म्हणून जो सत्ता गाजवतो. त्यांची नव्हे किंवा निव्वळ मजूरांची नव्हे तर ती राष्ट्रातील जनतेची आहे. ही आर्थिक व्यवस्था निर्माण करताना वर्गविग्रह आला तर त्याला भ्यायचे कारण नाही. या ध्येयाच्या दृष्टीने आपले आयुष्य मजुरांच्या चळवळीत घालवणारे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कार्यकर्ते हेच मजुराचे पुढारी होण्यास लायक ठरतील. [१९]

वरील विवेचनावरुन बागलांची कामगार चळवळीसंबंधीची सैध्दांतिक भूमिका स्पष्ट होते. समाजाची सर्व क्षेत्रात सत्ता संपादित करणे हे त्यांच्या चळवळीतल मुख्य सुत्र दिसून येते.

## नगर पालिका निवडणूक पाठिंबा :

कोल्हापूर नगर पालिकेच्या निवडणूकीत कामगार सभेची कोणती भूमिका राहील याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. कारण बागलांच्या नेतृत्वाखाली प्रजा परिषदेचा " करविर स्थानिक स्वराज्य संघ " या निवडणूकित प्रमुख पक्ष म्हणून उतरला होता.

१२ एप्रील १९४५ रोजी होणा-या या निवडणूकित कोणती भूमिका घ्यावी यासाठी कोल्हापूर संस्थान कामगार सभेची माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत प्रजा परिषदेने उभे केलेल्या सर्वच उमेदवारांना पाठींबा देण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. [२०] या निवडणूकित प्रजा परिषदेला नगरपालिकेत बहुमत प्राप्त होवून सत्ता मिळाली होती. बागलांच्या मार्गदर्शनाखाली काम करणा-या या पालीकेतील पदाधिका-याने अनेक समाज उपयोगी व दलीत शोषित माणसांच्या फायद्याचे निर्णय घेतले होते.

## शाहू मिलचा दुसरा लढा :

शाहू मिल मजूरांनी १ फेब्रुवारी १९४६ रोजी दरबारावर मोर्चा काढून आपल्या मागण्याचे निवेदन सादर केले. या मागण्या पुढील प्रमाणे आहेत.

१. शाहू मिल मधील कामगारांना मिळणारे वेतन १९३५ च्या युध्दापेक्षा

.....

कमी आहेत. तरी युध्द काळात शाहू मिलला ३४ लाख रुपये नफा झालेला आहे. तेव्हा दरबारने त्वरीत पगारात वाढ काण्यात यावी.

२. हल्ली शाहू मिल कामगारांना मिळणारा महागाई भत्ता कोल्हापूरच्या दृष्टीने विचार केल्यास फारच अपूरा पडत आहे. प्रत्येक कामगारास दररोज एक रुपाया महागाई भत्ता मिळावा.

३. मध्यवर्ती सरकारच्या फॅक्टरी ॲक्ट मध्ये गिरणीत कामाची वेळ आठ तासाचा दिवस गृहीत धारलेला आहे. तरी संस्थानातील ॲक्टमध्ये असलेल्या नऊ तासाचा दिवस रद्द करून त्याचे रुपांतर आठ तासाचे करावे.

या मागण्यासाठी बागलांनी चार महिने लढा देवून १७ मे १९४६ ला ११ दिवसांचा संप करून २८ मेला दरबारकडून मान्य करून घेण्यात यश प्राप्त करून घेतले.[२१] या मागण्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

शाहू मिल कामगार संघाची बैठक १५ मार्च १९४६ रोजी माधावराव बागलांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या बैठकीत बोलताना बागल म्हणाले की, आतापर्यंन्त आमच्या मागण्या संपाचा अवलंब न करताच आम्ही मिळविल्या आहेत. तडजोडीचा मार्ग आम्ही कधीच टाकला नाही. पण आता स्वस्थ बसणे अशक्य होत आहे. मागण्या करून दीड महिन्याचा कालावधी लोटला पण त्याला दरबारकडून काहीच उत्तर आले नाही. मंत्र्याकडे सविस्तर माहिती कळविल्यानंतर त्यांनी तडजोडीची तयारी दाखविली पण मिलच्या व्यवस्थापकाकडून काहीही उत्तर आलेले नाही. म्हणून नाईलाजाने संपाची भाषा बोलावी लागत आहे. तडजोड झाली नाही तर संपाशिवाय दुसरा मार्ग नाही. याकरिता आतापासूनच तयारीला लागून स्वत: काटकसर करा, मुँठभर

.....

घास मागे ठेवा, दुसरे मदतीला येतील या अपेक्षेवर राहू नका. ऐक्यास प्राणापलीकडे जपा. यानंतर कामगारांनी आम्ही आंदोलनातून कोणत्याही स्थितीत माघार घेणार नाही अशी शपथ घेवून २७-३-४६ रोजी मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन दरबाराकडे सादर करण्यांचा निर्णय घेतला.[२२]

माधवराव बागलांनी " अखंड भारत" या आपल्याच साप्ताहिकात लेख लिहून १९३५ च्या पेक्षा सध्याचा पगार कसा कमी आहे हे पुढील तक्ता देवून व स्पष्टीकरण दिलेले आहे.

तक्ता क्रमांक १

शाहू मिल कामगारांचे वेतन

| क्र. | खाते | १९३५च्या पूर्वीचा पगार | हल्लीचा पगार १९४६ | पूर्वीची खात्यातील माणसे | हल्लीची माणसे ४६ची स्थिती | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | |
| १) | मिक्सींग | १५ | १५ | ६ | ५ | एक कमी केला |
| २) | ओपनर | १३ | १३ | १ | १ | - |
| ३) | फिनिशर | १७ | २२ | २ | १ | एक कमी केला |
| ४) | इंटर | ११ | २२ कायम | २ | १ | --"-- |
| ५) | कार्ड | ११ | ११ | १० | ५ | पांच कमी केले |
| ६) | ग्लाबिंग | २४ | १९ | १ | १ | - |
| ७) | त्रासन ड्रॉफर बॉईज | ७ | ७ | - | - | संख्या कमी केली आहे |
| ८) | यु. वायडिंग | ८ | ८ | १० | ५ | पांच कमी केले |
| ९) | रीलिंग | ७ ते १० | ७ ते १० | - | - | - |

.....

वरील तक्त्यावरून लक्षात येते की, मिल मधील कामगारांची संख्या कमी करून कामगारांचा पगार १९३५ साली आहे तेवढाच ठेवण्यात आला आहे. तर कांही विभागातील वेतन कमी करण्यांत आले आहे. [२२]

२७ मार्च १९४६ रोजी वरील मागण्यासाठी आयोजित केलेला नियोजित मोर्चा सुधारणा मंत्र्याकडून चर्चेचे निमंत्रण आल्यामुळे स्थगित करण्यांत आला. २ एप्रिल १९४६ पर्यन्त या मागण्यासंबंधी कळविण्याचे मंत्र्यांने शिष्टमंडळास आश्वासन दिले. [२३]

मजूरांच्या मागण्याकडे दरबार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे संप झालाच तर त्याची जबाबदारी दरबारावरच राहिल, असे सुचित करणारे पत्र ३ एप्रिल १९४६ रोजी पंतप्रधान मिचले यांना संघटनेच्या बैठकीत विचार करून बागलांनी पाठविले. या पत्रात बागल म्हणतात की, आम्हास हे पत्र लिहिताना खेद होतो की २ एप्रिल ४६ रोजी आमच्या मागण्यासंबंधीचे उत्तर यावयाला हवे होते. तसे आम्हांला आश्वासन मिळाले होते. पण उत्तर न आल्यामुळे नको असलेला प्रसंग आमच्यावर ओढवणार आहे. संपावर जाण्यास किंवा संपाची नोटीस देण्यास आम्ही उत्साही नाही. पण दिनांक ११ एप्रिल १९४६ पर्यन्त दरबाराकडून आम्हांला उत्तर आले नाही तर आम्हाला दुसरा मार्ग स्विकारल्याशिवाय गत्यंतर नाही.अशी परिस्थिती निर्माण होईल आणि त्यानंतर मात्र आम्हांस दोष देवू नये. [२४]

बागलांनी पत्रात नमूद केल्याप्रमाणे दरबाराकडून ११ एप्रिल ४६ रोजी उत्तर आले पण कामगारांची निराशाच झाली. म्हणून त्याच दिवशी माधवराव बागलांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या

.....

संबंधी चर्चा झाली. फक्त मोर्चाच काढावा, संप करू नये अशी बागलांची भूमिका होती पण कामगारांचाच संपाचा आग्रह वाढल्यामुळे संपाचा निर्णय घेण्यात आला.[२५]

कामगार संघटनेने १ फेब्रुवारी १९४६ रोजी दरबाराकडे मागण्या केल्या. आज २ मे १९४६ पासून १५ दिवसांच्या आंत त्या पूर्ण नाही झाल्यास १८ मे पासून कामगार संपावर जातील अशी नोटीस बागलांनी व्यवस्थापन व दरबाराकडे पाठविली.[२६] पण १८ मे पर्यन्त दरबाराकडून संघाच्या मागण्या मान्य केल्याचे कांहीच उत्तर न आल्यामुळे १८ मे १९४६ पासून शाहू मिलचे कामगार संपावर गेले. या दिवशी कामगारांनी शहरातून मिरवणूक काढून आपल्या मागण्याकडे जनतेचे लक्ष वेधून घेतले.[२७] संप सतत अकरा दिवस चालू होता. तेंव्हा दरबारने शाहू मिल कामगार संघटनेने १ फेब्रुवारी १९४६ रोजी केलेल्या मागण्या मान्य केल्याचे २८ मे १९४६ रोजी जाहीर केले. यामुळे हा संप स्थगित करण्यात आला. हा संप यशस्वी करण्यात माधवराव बागल यांच्यासोबत संघटनेचे सेक्रेटरी विश्वासराव पाटील यांनी परिश्रम घेतले होते.[२८]

शाहू मिल कामगारांच्या प्रश्नावर सातत्याने लक्ष केंद्रीत करून त्यांच्या मागण्या मान्य करून घेण्यात बागलांना यश प्राप्त झाले. संस्थानातील आजपर्यन्तच्या कामगार चळवळीत हे यश अत्यंत महत्वाचे मानले जाते. कारण संस्थानात मुळत: संघटना स्थापन करण्याचेच स्वातंत्र्य नव्हते. त्या मागणीसाठी प्रजा परिषद व कामगार संघटनेच्यावतीने संघर्ष करून बागलांनी संघटना स्थापन्याचा हक्क प्रस्थापित करून नंतर कामगारांची संघटना बांधली व संघटीत कामगारांना त्यांच्या लढयातून

.....

यश प्राप्त होऊ शकते असा आत्मविश्वास निर्माण करून दिला. यामुळे संस्थानात कामगार चळवळ आपले स्वरूप पुढील काळात व्यापक बनवू शकली.

## शुगर मिल हंगामी कामगारांचा लढा :

करवीर संस्थानातील शुगर मिल १९४२ साली रूईया शेठजीने दरबाराकडून विकतच घेतली होती. या मिल मध्ये काम करणाऱ्या मजूरांना संघटीत करण्याचे प्रयत्न बागलांनी केलेले होते. दि. ४ फेब्रुवारी ४४ रोजी माधवराव बागलांच्या अध्यक्षतेखाली कामगारांची बैठक होवून शुगर मिल मधील हंगामी कामगारांच्या मागण्या संदर्भात विचार पुढील ठराव संमत करण्यात आले.

१. हंगामी कामगाराचे किमान वेतन महीना बारा रूपया वरून वीस रूपये देण्यात यावे.

२. हंगामी कामगारांना कायम कामगाराप्रमाणे चार महिन्याच्या पगारा इतका बोनस मिळाला पाहीजे.

या ठरावातील मागण्या मान्य करून घेण्यासाठी बागलांच्या आदेशावरून शुगर मिल कामगारांनी दोन दिवसांचा अन्न सत्याग्रह केला. त्यानंतर रूईया शेठजीने त्यांच्या पगारात पाच रूपये वाढ म्हणजे सतरा रूपये प्रति महीना वेतन व दोन महिन्याच्या पगारा एवढे बोनस देण्याचे मान्य केले. पण यानंतर प्रत्यक्षांत रक्कम देण्यास काही काळ टाळाटाळ करून पुढे पाच एप्रील रोजी मान्य केल्याप्रमाणे वेतन वाढ वबोनस कामगारांना देवून टाकले. दोनच महिन्याच्या कालावधीत या मागण्या मान्य करून

.....

घेण्यास संघटनेस यश प्राप्त झाले. या आंदोलनास पाठींबा देणारा ठराव शाहू मिल कामगार संघटनेने संमत केलेला होता. [२९]

हजार मिल हंगामी कामगारांचा १४ फेब्रुवारी ४४ ते १६ फ फेब्रुवारी ४४ या काळात पार पडलेला दोन दिवसांचा अन्न सत्याग्रह शांततेने पार पडून आपल्या संघटीत शक्तीवर त्यांच्या मागण्या मान्य करून घेतल्याबद्दल बागलांनी आनंद व्यक्त करून कामगारांचा आत्मविश्वास वाढविण्यात यश मिळाले असे मत व्यक्त केले होते. [30]

शुगर मिल कामगारांची मागणी मान्य झाल्यानंतर व रक्कम मिळाल्यानंतर हंगामी कामगारांच्या बैठकीत तीनशे रूपये निधी जमा करण्यात आला. यातील दोनशे रूपये पुन्हा या कामगारांचे आंदोलन सुरू झाले तर त्यावर खर्च करण्यासाठी व शंभर रूपये कामगार संघटनेच्या निधीसाठी खर्च काण्याचा निर्णय घेण्यात आला. भावी काळात पुन्हा आपल्या मागण्यासाठी कामगारांना सततचा लढा द्यावा लागणार आहे त्याशिवाय इतर मार्ग शिल्लक नाही असेच बागलांनी हा निधी जमा करीत असताना कामगारांना स्पष्ट केलेले दिसते. भविष्यातील लढयाचा विचार यामधून स्पष्टपणे दिसून येतो.

## शुगर मिल कामगारांचा पुढील लढा :

शुगर मिल मध्ये काम करणा-या हंगामी व कायम स्वरूपाच्या कामगारांची बैठक ५ जानेवारी ४५ रोजी बागलांच्या अध्यक्षतेखाली होवून त्यांच्या मागण्याचे पुढील ठराव संमत करण्यात आले.

१. मिल मध्ये काम करणा-या निरनिराळ्या खात्यातील कामगारांचे वेतन १९४२ सारखे असावेत. कारण १९४२ साली रूईया शेठजींने मिल ताब्यात घेते वेळी कामगारांना ५० टक्के युध्द भत्ता जाहीर

......

केलाइ होता पण प्रत्यक्षात मुळ पगारातील २५ टक्के वेतन कपात केली होती हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

तक्ता क्रं. २

| क्रं. | कामाच्याज जागेचे नांव | १९४२ चे पगार | १९४५साली मिळणारा पगार |
|---|---|---|---|
| १. | मिलमन | ६0 | ४0 |
| २. | मिल इंजिन ड्राइव्हर | ४0 | ३0 |
| ३. | मोटार ड्राइव्हर | २५ | १८ |
| ४. | इतर कामगार | १५ | १२ |

२. जादा वेळ काम केल्याचा पगार वेळच्या वेळी मिळावा.

३. कायम नोकरा प्रमाणे हंगामी नोकरांना चार महिने पगार इतका बोनस देण्यात यावा .

४. १५ डिसेंबर ४0 पासून कमी केलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेण्यात यावे.

५. कोणत्याही कामगाराचे किमान वेतन प्रतिदिनास २0 रूपये कमीत कमी असावे.

६. चालू स्थितीत प्रतिदिनास एक रूपाया महागाई भत्ता मिळावा.

......

कोल्हापूर संस्थान, रूईया शेठ, संचालक या मागण्या तात्काळ मान्य करतील अशी संघटनेची अपेक्षा असून आम्ही संपाची धामकी न देता या मागण्याचे निवेदन सादर करीत आहोत असे ठरावात शेवटी नमूद करण्यात आलेले होते. [३१] यावेळी माधवराव बागलानी अखंड भारत या वृत्तपत्रात लेख लिहून महागाईची व शुगर मिलच्या फायद्याची बाजू जनते समोर मांडली होती. या लेखात त्यांनी म्हटले होते की, दुसऱ्या महायुध्दापुर्वी एक रूपयाला वीस शेर जोंधळा मिळत होता आता ४५ साली ४ शेर सुध्दा मिळत नाहीत. चार आणे वाराचे कापड रूपाया वार झालेले आहे. पण १९४२ साली रूईया शेठजीने शुगर मिल दरबारकडून ताब्यात घेतल्यावर्षी ८ लाख नफा व २ लाख रिझर्व फंड शिल्लक होता. तर ४४ अखेर ५ लाख नफा व २० लाख रिझर्व फंड शिल्लक आहे. तेव्हा रूईया शेठजीने कामगारांच्या मागण्या मान्य करण्यास काहीच हरकत नाही. असे त्या लेखात नमूद करण्यात आले होते. [३२]

वरील मागण्याच्या पुर्ततेसाठी सुरू असलेला संप बागलांच्या सुचनेवरून २० जानेवारी ४५ पर्यंत स्थगित केला होता पण शेठजीने दाद न दिल्यामुळे पुन्हा २१ जानेवारी ते ३० जानेवारी ४५ या काळात दहा दिवस संप केल्यानंतरही रूईया शेठ मागण्या मान्य करण्यास नकारच देत होते. या मागण्याकडे दरबारचे लक्ष केंद्रीत व्हावे या साठी पंतप्रधान मिचले यांना लक्ष घालण्याचे आवाहन केले होते. ३० जानेवारी ४५ रोजी कोणतीही मागणी पदरात न पडताच कामगारांनी संप मागे घेतला. या आंदोलनास मदत म्हणून कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार संघाने तीनशे रूपयाची मदत दिली होती. [३३]

......

शुगर मिल कामगारांचा विचार करण्यासाठी नियुक्त केलेल्या लवादाने १० एप्रील ४५ रोजी आपला निर्णय जाहीर केला. यात कमी केलेल्या कामगारांना परत कामावर घेण्याचे व २० रुपये किमान वेतनाची मागणी त्यांनी फेटाळली. या लवादाच्या निर्णयावर मत व्यक्त करताना बागलांनी सांगितले की, भांडवल शाहीत लवाद मंडळ मालकाच्या बाजूनेच झुकलेले असतात त्यामुळे कामगारांना त्यांच्याकडून कदापी न्याय मिळणार नाही. [३४]

शुगर मिल कामगारांचा हा लढा मोठ्या जिद्दीने बागलांनी लढवला. इतर संघटनाने या लढ्यास सक्रीय सहकार्यही दिले पण या लढ्यात मागण्या मात्र मालकाच्या आडमुठे धोरणामुळे मान्य झाल्या नाहित बागलांनी आजपर्यंत केलेल्या चळवळीत फक्त याच चळवळीत निराशा पदरी पडली. इतर आंदोलनात त्यांनी कामगारांना काही ना कीही गोष्टी मिळवून दिलेल्या आहेत. पुढे वेळ आल्यानंतर पुन्हा लढा सुरु करण्याचा त्यांचा निर्धार कायम होता.

## सिनेमा गृह कामगार संघटना :

कोल्हापूरातील सिनेमागृहात काम करणाऱ्या कामगारांची संघटना स्थापन करावी यासाठी बाबुराव रुईकर यांच्या प्रयत्नाने दि.८ मार्च १९४४ रोजी बागलांच्या अध्यक्षतेखाली बैठक होवून संघटना स्थापण्याचा निर्णय होवून बागलांची अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. या बैठीत पुढील मागण्या करणारे ठराव संमत करण्यात आले.

......

१. सध्या मिळत असलेला ७ ते ९ रुपये पगार युध्दाच्या महागाई मुळे अपुरा पडत असल्यामुळे किमान वेतन म्हणून प्रतिदिनाला २० रुपये देण्यात यावेत.

२. वर्षांतून तीन महीन्याच्या वेतना इतके बोनस देण्यात यावे. कारण इतर कामगारासारखी आठवडयाची सुट्टी मिळत नाही. [३५]

या मागण्या सिनेमागृह मालकांकडे पाठवल्यानंतर एक महीन्याच्या कालावधीनंतर मालक - कामगार यांच्यात तडजोड होवून डोअर किपरला किमान वेतनाच्या मागणी प्रमाणे २० रुपये देण्याचे तत्वत: मान्य करण्यात आले. पण प्रत्यक्षांत फॅक्टरी अॅक्ट प्रमाणे ८ तासाचे काम सिनेमागृहात नव्हते. फक्त दोनच खेळ होत असल्यामुळे सहा तासाच्या कामाप्रमाणे १३. ५० पैसे महीना देण्याचे ठरले. यावेळी मात्र थिअटर ऑपरेटरचा पगार वाढ झाला नाही पण ऑपरेटरनी डोअर किपरच्या पगार वाढीवर समाधान मानून कामगार संघटना व मालक यांच्यातील तडजोडील मान्यता दिली. यासंबधी बागलाने ऑपरेटरच्या भूमिकेचे कौतुक केले. बोनसची मागणी मात्र मान्य होवू शकली नाही. [३६]

कोल्हापूर शहरात असलेल्या रॉयल, पद्मा, प्रभात व राजाराम या चार सिनेमागृही पैकी राजाराम वगळता इतरत्र किमान वेतन देण्यास प्रारंभ करण्यात आला पण राजाराममचे मालक बाबूराव पेंढारकर यांनी टाळाटाळ सुरु केली. या संबधी बागलानी अखंड भारताच्या २५ मे ४४ च्या अंकात लेख लिहून पेंढारकरांना कामगारांची पगार वाढ त्वरीत द्यावी असे आवाहन केले. [३७] यानंतर सातत्याने मागणी केल्यानंतर बाबूराव पेंढारकरांनी डोअर किपरला रु. १३.५० पैसे प्रमाणे प्रतिमहिना वेतन देण्यास नोव्हेंबर ४४ मध्ये सुरुवात केली. [३८]

......

शहरातील असंघटीत असलेल्या सिनेमागृह कामगारांची संघटना स्थापन करुन अल्पावधितच-- त्यांच्या रास्त मागण्या मंजूर करुन घेण्यात बागलांना यश मिळाले होते.

शिवरगांवकर मिलचा पुढाकार :
======================

कोल्हापूर संस्थानात २६ मार्च १९४४ रोजी कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार संघास्थापना झाल्यानंतर अनेक कामगार संघटनांच्या काही मागण्या संप, अन्न सत्याग्रह निवेदने दिल्यानंतर पदरात पडल्या पण १५ एप्रील १९४४ रोजी शिवरगांवकर मिलने कामगाराकडून कोणत्याही मागणीचे निवेदन नघेता चळवळीचा प्रभाव पाहून कामगारांच्या पगारात दुप्पट वाढ केल्याचे जाहीर केले. विविध विभागात काम कम्प करणा-या कामगारांना पुर्वी १५, २०, १३, १४, १६ असा पगार मिळत होता पण पगार वाढीनंतर तो पगार अनुक्रमे ३०, ४०, २६, २८, व ३२ असा करण्यात आला. या निर्णयाचे बागलांने जाहीर पत्रक प्रसिध्द करुन स्वागत केले व इतरांनी देखील शिवरगांवकरांचा आदर्श जोपासावा असे आवाहन केले.[३९]

शिंपी कामगारांचा प्रश्न :
==================

माधवराव बागलांची कामगार क्षेत्रात लढाऊ नेता म्हणून प्रतिमा निर्माण झाली होती. कामगार व मालकात सातत्याने तडजोड होऊन परस्परांच्या समजूतीने प्रश्न सुटावा अशीच भूमिका माधवराव बागल घेत होते. या काळातच कोल्हापूर शहरातील शिंपी कामगार व मालक यांच्यात वाद सुरु झाला. दोघांच्या तडजोडीने माधवराव बागलांचा निर्णय मान्य करण्याचे १४ फेब्रुवारी ४५ रोजी ठरले. या क्षेत्रातील कामगारांच्या मागण्या पुढील प्रमाणे होत्या.

.....

१. शिवणावळीत जो रुपाया मिळतो त्यापैकी आठ आणे मजूरी दिली जाते. त्यात वाढ करून १० आणे देण्यात यावी.

२. कायम पगारी नोकरांना यापुढे रोज मजु-यावर पत्करले जावे.

या मागण्यांच्या संदर्भात बागलांनी मजूरीत दहा आणे देण्याचे व त्यातील दोन आणे महागाई भत्ता समजण्याचे सांगितले. ज्या नोकरांना कायम पगारावर नोकरी नको असेल त्यांना दैनंदिन कामावर नोकरी करण्याची परवानगी द्यावी मजूराने नोकरी सोडण्यापुर्वी किंवा त्याला कमी करण्यापुर्वी प्रत्येकाने किमान तीन आठवडयाची नोटीस दिली पाहीजे तसेच मजूराने एका कामावर असताना रजा काढून दुस-याचे काम पत्करू नये.

बागलांचा हा निर्णय कामगार व मालकाने मान्य केल्यामुळे शिंपी कामगारांचा संप मिटला. [४०]

सरकारी नोकरांचा संप :

मुंबई प्रांतातील सरकारी नोकरा प्रमाणे वेतन व महागाई भत्ता मिळावा या मागणीसाठी कोल्हापूर संस्थानातील सरकारी नोकर संघाच्या आदेशावरून सरकारी कर्मचारी जानेवारी १९४७ मध्ये संपावर गेले. संपामुळे सरकारचा कारभार ठप्प झाला. कार्यालयास टाळे लागले. नेहमी प्रमाणे दरबारचा पंचगंगेवर जाणारा शुक्रवारचा छबीना हत्तीवर बसावयाला माहुत मिळाला नाही म्हणून जावू शकला नाही.

हा संप प्रारंभीच्या काळात बागलांच्या आदेशानुसार सुरु झालेला नव्हता. पण बागलांनी आपल्या सर्व कामगार संघटनासह या संपात सहभागी होण्याचे ठरविले. कारण पुढील काळात दरबार विरूध्दच्या लढयात

.....

सरकारी नोकराचे सहकार्य मिळावे व कामगारांनी ही बागलाचे नेतृत्व मान्य केले होते. कारण बागलांने यापुर्वी संस्थानातील इतर कामगार चळवळीत यश प्राप्त केलेले होते व त्यांच्या पाठीशी प्रजा परिषदेसारखी मजबूत संघटना उभी होती.

बागलांने ११ जानेवारी ४७ रोजी बिंदु चौकात सभा घेवून सरकारी नोकर संघाच्या मागण्यास पाठींबा दिला व दरबारला या मागण्या मान्य करण्याचे आवाहन केले. या सभेला जवळपास पंधराहजार नागरिक उपस्थित होते. [४१]

या जाहीर सभेनंतर दरबार व कामगार नेते याच्यात १३ जानेवारी ४७ रोजी जवळपास दोन – तीन तास चर्चा होवून मुंबई प्रांताप्रमाणे वेतनवाढ व महागाई भत्ता देण्याची मागणी मान्य करण्यात आली. पण संपकालीन पगार मात्र दिला जाणार नाही असे दरबाराने सांगितले. नोकरांने १७ जानेवारीपासून कामावर हजर राहण्याचे ठरले. कामगारांच्यावतीने माधवराव बागल, वसंतराव बागल, प्रभाकर शिंदे, नारायणराव सरनाईक, दत्तात्रय शिंदे, सरकारी नोकर संघाचे बाईंगडे यांनी व दरबार तर्फे पंतप्रधान ऑस्टीन, मंत्री गुलाबराव पाटील, पी. बी. पाटील यांनी भाग घेतला होता. या वाटाघाटीनंतर सरकारने मुंबई राज्याप्रमाणे संस्थानातील नोकरांना वेतन व महागाई भत्ता देण्यात येईल असे पत्रक प्रसिध्द केले. [४२]

वाटाघाटी झाल्यानंतर १७ जानेवारीपासून सरकारी कामगार कामावर हजर झाले. मागणी मान्य झाल्याचा त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. सरकारने आपला शब्द फिरवला. सरकारचे म्हणने असे

......

की, आम्ही मुंबई प्रांताच्याधातींवर देण्याचा प्रयत्न करू असे म्हटले होते. तंतोतंत त्या वेतन व भत्यासारखेच देवू असे म्हटले नाही. कारण इथली स्थितीच निराळी असल्यामुळे तेवढे वेतन देणे परवडणार नाही. सरकारने शब्द फिरविल्यामुळे नोकर व बागलांना धक्काच बसला. कारण नोकर पुर्ववत कामावर रूजू झाले होते. त्यांच्या फसवणूकीला आपण जबाबदार आहोत यासाठी उपोषण करण्यांचे बागलांनी ठरविले. [४३]

बागलांचे उपोषण :
==============

संस्थानातील नोकरांच्या मागण्यासंबधीचा शब्द दरबारने फिरविल्यानंतर प्रजा परिषदेच्या जन्मदिनी म्हणजे ६ फेब्रुवारी ४७ रोजी बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय बागलांने जाहीर केला. या मागण्याचा पुनरविचार करण्यासाठी दरबारला पंधरा दिवसाची त्यांनी मुदतही दिली. घोषणेप्रमाणे २२ फेब्रुवारी ४७ पासून आपल्या घरीच बागलांनी उपोषण सुरू केले. अवघ्या पाच दिवसातच बागलाचे दहा पौंड वजन कमी होवून प्रकृती खालावत होती. दि. २ मार्च १९४७ रोजी दरबार व अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषदेचे नेते कमल नयन बजाज, शांतीलाल शहा यांच्यात वाटाघाटी झाल्या या वटाघाटीत सरकारी नोकरांच्या वेतन वाढीचा विचार करण्यासाठी एक पे कमीशन मध्ये प्रजा परिषदेचे दोन सदस्य मजूर संघाचा एक सदस्य, दरबारचा एक सदस्य, बिनसरकारी एक, व विधीमंडळाचा एक असे सहा सदस्यराहतील. या कमीशनने दिलेल्या अहवालची अंमलबजावणी १. जानेवारी ४७ पासून होईल असे ठरविण्यात आले. बागलांना हा निर्णय मान्य नव्हता पण कमल नयन बजाज, शांतीलाल शहा, या नेत्यांच्या विंनतीवरून त्यांनी आपले नऊ दिवसाचे उपोषण मागे घेतले या उपोषणामुळे बागलांना संस्थानातील जनतेने व इतर प्रमुख

......

नेत्यांनी पाठींबा व्यक्त केला होता. डॉ. पट्टाभिसितारामय्या, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री खेर यांचीही पत्रे यावेळी आलेली होती. [४४]

कोल्हापूरातील शिवाजी विद्यापीठात शे. का. पक्षाच्या नेतृत्वाखाली कर्मचारी संघटना कार्य करीत होती. डॉ. आप्पासाहेब पवार कुलगुरू असताना बेशिस्तवर्तन केलेल्या कर्मचारांना निलंबित करण्यात आले होते. पवारांच्या निर्णयास कुलपती व सिनेटनेही मान्यता दिलेली होती. कर्मचा-यांनी पदवीदान समारंभाप्रसंगी शिक्षण मंत्री मधूकरराव चौधरी यांना अडविले. त्यांनी या प्रश्नावर बागलांचा लवाद नियुक्त केला. याला सर्वांनी मान्यता दिली. बागलांनी पवारांच्या बाजूने निकाल दिला पण या कर्मचा-यांना दुसरे साधन उपलब्ध करून देण्यात यावे असा अग्रह धरला पण कर्मचा-यांनी न्यायालयात खटला दाखल केल्यामुळे ही सूचना बारगळली. [४५]

स्वातंत्र्योत्तर काळात प्रजा परिषदेचे शेतकरी कामगार पक्षात विसर्जन केल्यानंतर बागलांच्या वाढत्या राजकीय कामामुळे कामगार चळवळीतील सक्रीय सहभाग कमी झाला. पण १९४२ ते ४७ या काळात त्यांनी संस्थानातील विविध क्षेत्रातील असंघटीत, अकुशल, कुशल कामगारांना संघटीत करून त्यांच्या न्याय मागण्यासाठी लढे उभे करण्यात अतिव परिश्रम घेतले. कामगार चळवळीत काम करीत असतांना त्यांच्या राजकिय प्रशिक्षणाची सातत्याने बागलांने सोय केलेली होती. कारण समाजातील श्रमजीवी जनतेला संघटीत करून सत्तेचे केंद्र त्यांच्याच हाती मिळाल्याशिवाय शेतकरी - कामगारांचे स्वप्न साकार होवू शकत नाही याची जाणीव बागलांना होती. परस्परांच्या प्रश्नासाठी एकमेकास सहकार्य केल्याशिवाय प्रश्न सुटू

......

शकत नाही ही जाणीव कामगार संघटनात करून देवून समन्वय साधण्याचे काम बागलांनी या काळात केलेले दिसते.

बागलांचे कामगार चळवळीतील लक्ष कमी झाल्यानंतर शाहू मिल कामगार संघ शे. का. पक्षात सहभागी झाला. पुढे ही संघटना इंटक प्रणित बनली. शाहू मिल कामगारांच्या प्रेमामुळे व प्रयत्नामुळे मिल पुढील चौकात माधवराव बागलांचा त्यांच्या हयातीतच पुतळा बसवून त्या भागास "बागल चौक " असे नामकरण करण्यात आले. [४६]

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=

# संदर्भ सूची

## प्रकरण तिसरे

## कामगार चळवळ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | बागल माधवराव | जीवन प्रवाह | पान १११,१७१,७२ |
| | राजाराम पुरी, कोल्हापूर - १९५४ - | | |
| | ——"—— | जीवन संग्राम | पान २२,२३,२४,२५ |
| | ——"—— | पडसाद | पान १७८,१७९ |
| २. | ——"—— | जीवन प्रवाह | पान १७३ |
| | ——"—— | जीवन संग्राम | पान २५ |
| | ——"—— | पडसाद | पान १७९ |
| ३. | ——"—— | जीवन प्रवाह | पान १७३ ते १७६ |
| | सा. अखंड भारत, कोल्हापूर | | ११ मे ४४ |
| | स्व. बागल माधवराव. ——"——उक्त—— | | १६ मे ४४ |
| ४. | सा. अखंड भारत, कोल्हापूर | | २५ जानेवारी १९४४ |
| ५. | ——उक्त—— | | ९ मार्च ४४ |
| ६. | ——उक्त—— | | १३ एप्रील ४४ |
| ७. | ——उक्त—— | | ६ जुलै ४४ |
| ८. | ——उक्त—— | | ६ जुलै ४४ |
| ९. | ——उक्त—— | | १३ जुलै ४४ |
| १०. | ——उक्त—— | | १३ जुलै ४४ |
| ११. | ——उक्त—— | | १७ ऑगष्ट ४४ |
| १२. | ——उक्त—— | | १ नोव्हेंबर ४४ |


......

| | | |
|---|---|---|
| १३. | ——— उक्त ——— | २१ डिसेंबर ४४ |
| १४. | ——— उक्त ——— | 30 मार्च ४४ |
| १५. | ——— उक्त ——— | ६ एप्रील ४४ |
| १६. | ——— उक्त ——— | १४ जुन ४४ |
| १७. | ——— उक्त ——— | १८ नोव्हेबंर ४४ |
| १८. | ——— उक्त ——— | २० एप्रील ४४ |
| १९. | ———उक्त ——— | ११ जानेवारी व१ फेब्रुवारी ४५ |
| २०. | ——— उक्त ——— | ५ एप्रील ४५ |
| २१. | ——— उक्त ——— | ७ फेब्रुवारी ४६ |
| २२. | ——— उक्त ——— | २१ मार्च ४६ |
| २३. | ——— उक्त ——— | २८ मार्च ४६ |
| २४. | ——— उक्त ——— | ११ एप्रील ४६ |
| २५. | ——— उक्त ——— | १८ एप्रील ४६ |
| २६. | ——— उक्त ——— | ९ मे ४६ |
| २७. | ——— उक्त ——— | १८ मे ४६ |
| २८. | ——— उक्त ——— | 30 मे ४६ |
| २९. | ——— उक्त ——— | ७ फेब्रुवारी ४४ |
| 30. | ——— उक्त ——— | २१ फब्रुवारी ४४ |
| ३१. | सा•अखंड भारत कोल्हापूर | ११ जानेवारी ४५ |
| ३२. | सा• अखंड भारत, कोल्हापूर | ११ जानेवारी ४५ |
| ३३. | ——— उक्त ——— | १ फेब्रुवारी ४५ |
| ३४. | ——— उक्त ——— | १२ एप्रील ४५ |
| ३५. | ——— उक्त ——— | २३ मार्च ४४ |
| ३६. | ——— उक्त ——— | १३ व २० एप्रील ४४ |

.....

३७. ----- उक्त ----- २५ मे ४४
३८. ----- उक्त ----- ९ नोव्हेंबर ४४
३९. ----- उक्त ----- २० एप्रील ४४
४०. ----- उक्त ----- १५ फेब्रुवारी ४५
४१. बागल मा.खा.जीवन प्रवाह ११२,१३
४२. सा.अखंड भारत कोल्हापूर १६ जानेवारी ४७
४३. बागल मा.खा.जीवन प्रवाह ११५
४४. जीवन प्रवाह,अखंड भारत ६ मार्च ४७
४५. बागल माधवराव संघर्ष/सन्मान पान१५ ते १९
४६. बागल माधवराव जीवन प्रवाह १७५ ते ७६

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=

# प्रकरण - चौथे

## सत्यशोधक समाज व बागल

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# प्र क र ण चौ थे

## सत्यशोधक समाज व बागल

मध्ययुगीन काळातील सामाजिक, धार्मिक, व आर्थिक क्षेत्रातील सत्ता मुठभर उच्चवर्णीयांच्या हाती एकवटलेली होती. सामाजिक व राजकीय स्थैर्य टिकविण्यासाठी धर्माच्या नैतिकतेचा व बंधनाचा उपयोग केला जात होता. यामुळे धर्म सत्ता हाती असलेल्या अल्पसंख्यांकाचे वर्चस्व बहुसंख्य जनतेच्या मानगुटीवर होते.

समाजात शिक्षणापासून वंचित असलेला बहुसंख्य समाज आपल्या अज्ञानीपणामुळे अंधश्रध्देच्या व धार्मिक खुळचट कल्पनांच्या फे-यात अडकलेला होता. समाजाच्या या कमकुवतपणाचा फायदा पौरोहित वर्ग सवधाने घेत होता. त्यांच्या विरोधी त्या सामाजिक स्थितीतही काही समाज सुधारकांनी बंड काण्याचा प्रयत्न केल्याचा इतिहास आपल्याला दिसतो. पण धर्माच्या नैतिकतेची व आदर्श मूल्यांची चौकट कायम ठेवून त्यातील वाईट पध्दत बंद करुन धर्माचे शुध्दीकरणच काण्याचा या समाज सुधारकांनी प्रयत्न केलेला आहे. त्या काळातील सामाजिक स्थिती लक्षात घेतलीतर हा शुध्दीकरण कार्यक्रम देखील क्रांतीकारकच वाटतो. कारण धर्माच्या नांवावर आपले वर्चस्व गाजवणा-या भटशाहीला ते आव्हान नकोच होते.

१९ व्या शतकात भारतातील निरनिराळ्या प्रांतात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी व्यक्ती व संस्थानी प्रयत्न केल्याचे

.......

दिसतात. यात राजा राममोहन रॉय, महर्षि दयानंद, यांच्या ब्रहमो-समाज व आर्यसमाज या संघटनांचा प्रामुख्याने समावेश होतो. त्यांनी समाजातील अंधश्रध्दा व वाईट चालिरीती यांच्या विरोधात प्रखर चळवळ चालवल्याचे चित्र त्या काळात भारतात दिसते.[१]

महाराष्ट्रातील त्या शतकातील सामाजिक स्थिती देखिल यापेक्षा निराळी नव्हती. पेशवाईच्या काळात निर्माण झालेले ब्राहमण वर्चस्व पेशवाई जावून इंग्रजांचे राज्य आल्यानंतरही कायमच होते. यामुळे समाजातील कुणबी व इतर जामी-जमातीतील जनता या पिळवणूकीचे पिढयानपिढया शिकार बनलेले होते.

इंग्रजी विद्येच्या प्रसारामुळे कांही प्रमाणात शिक्षणाचा प्रसार सुरु झालेला होता. या काळातच महात्मा जोतीराव फुले यांचा उदय होवून त्यांनी प्रस्तापित ब्राहमणी वर्चस्वाच्या विरूध्द बंड पुकारले. या कामासाठी त्यांनी जाहीर सभा, पुस्तके, पत्रके याव्दारे आपले मत व्यक्त करुन समाजातील शुद्र ,अतिशुद्रांना त्यांच्या न्याय अधिकारासाठी संघटित करण्यास सुरूवात केली.

प्रस्तापित समाज आपली सर्व क्षेत्रातील सत्ता सहजासहजी सोडणार नाही. उलट न्याय मागण्यासाठी संघटित होत चाललेल्या चळवळीस मोडून काढण्यासाठी आपली शक्ती पूर्णत: खर्च करील याची फुल्यांना स्पष्ट कल्पना असल्यामुळे त्यांनी धार्मिक, सामाजिक पातळीवर वैचारिक भूमिका मांडण्यासाठी व प्रस्तापित समाज व्यवस्था संपुष्टात आणून एक नवा समतेवर व सामाजिक न्यायावर आधारित मानवी मुल्यांची जोपासणा करणारा समाज उभा करण्यासाठी एका

.....

व्यासपिठाची गरज भासू लागली. यासाठी त्यांनी आपल्या समविचारी सहका-यांच्या मदतीने पुणे येथे दिनांक २४ एप्रिल १८७३ रोजी "सत्यशोधक समाज" या संस्थेची स्थापना केली.[२]

सत्यशोधक समाजाचे उद्देश :

सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यानंतर त्याचे पुढील उद्देश निश्चित करण्यांत आले. " शुद्र आणि अतिशुद्र यांची ब्राहमण पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद करणे. त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची व अधिकारांची शिकवणूक देणे आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे."[3]

त्रिसुत्र कार्यक्रम :

सत्यशोधक समाजाने आपला कार्यक्रम जाहीर केला. त्याला त्रिसुत्र कार्यक्रम म्हणून ओळखाले जात होते. हा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

१. ईश्वर आणि भक्त यांच्यामध्ये मध्यस्तांची गरज नाही. भट-भिक्षूक धर्माचा धाक दाखावून अडाणी जनतेची अधर्माने जी पिळवणूक करतात त्या अन्यायापासून त्यांची मुक्ता करणे.

२. जमीनदार-सावकार यांच्या मगरमिठीतून शेतक-यांची सुटका करणे.

३. शिक्षण सर्वांना सहज लाभावे व सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न करणे.[४]

हा त्रिसुत्र कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जोतीरावांने अस्पृश्यांकरिता घरची विहिर पाणवठ्यासाठी खुली केली. अस्पृश्य समाजातील मुलांसाठी व स्त्रियांसाठी शाळा काढल्या, ब्राहमण

.....

पुरोहिताशिवाय सत्यशोधक पध्दतीने असंख्य विवाह लावले. यासाठी त्यांनी सामाजिक पातळीवर खूपच त्रास सहन केला.

१८८० च्या दरम्यान मुंबईतील कामगार क्षेत्रात संघटना बांधून सत्यशोधक समाजाच्या चळवळीचाच एक भाग म्हणून लोखंडे काम करीत होते. या चळवळीत जोतीराव स्वत: लक्ष देवून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत असत. कामगारांची स्थिती सुधारणे हे प्रमुख ध्येय या चळवळीत होते. कारण सत्यशोधक चळवळीचा मुख्य भार शेतकरी आणि कामगार यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे यावर होता. या चळवळीचे धार्मिक, सामाजिक यांच्या नांवाखाली चाललेले शोषण बंद करणे हे दुसरे प्रमुख उद्देश होते.[५] त्या अनुषंगाने कामगार व शेतकरी यांना संघटित करण्याचे काम सत्यशोधक समाजाने मोठ्या जिद्दीने सुरु केलेले होते.

महात्मा फुलेनी जो सत्यधर्म सांगितला त्यात ईश्वर आहे पण निर्मिक पुरुषरुपी नाही. ते ईश्वराला "मा-बाप" असे "स्त्री-पुरुष" संयुक्तरुपी नांवे देत असत.[६]

फुल्यांनी स्त्री - शुद्र - अतिशुद्र यांच्यावर होणा-या अन्यायासाठी ब्राहमण नेतृत्व व विचारावर प्रखर हल्ले केले. श्रमिक-शोषितांच्या हिताच्या आड जे येईल त्यांच्या विरोधात त्यांनी आवाज उठवला. ब्राहमणाशिवाय इतर कोणत्याही उच्च जातीचा त्यांनी हितसंबंध राखण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांचा हा प्राथमिक अविष्कार असला तरी त्यांची वैचारिक बैठक समतेची, ~~मानव~~ मानवतेची व विश्व कुटूंबाची होती. यातच त्यांना समाजाचे हित व कल्याण दिसत होते.[७]

.....

## आंदोलनाचे स्वरूप :

फुलेंच्या चळवळीत राजकीय विरूध्द सामाजिक किंवा आर्थिक असे व्दंद नव्हते. त्यांनी ज्या स्त्री-शुद्रांना त्यांच्याशी ते प्रामाणिक होते. सामाजिक व आर्थिक प्रश्नांच्या अनुषंगाने राजकारण येते हे गृहीतच होते. यासंबंधीचे स्पष्टीकरण त्यांच्या लेखात व कार्यक्रमातून होत होते. " सार्वजनिक सत्यधर्म" या पुस्तकांत जोतीराव म्हणतात, निर्माण कर्त्याने स्त्री-पुरूषात धर्म व राजकीय स्वातंत्र्य दिलेले आहे. एखादा मानव अथवा कांही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तींवर जबरी करू शकणार नाहीत.

पण सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांला राज्यसत्तेशी निष्ठेने वागेन अशी शपथ घ्यावी लागत असे त्यामुळे सत्यशोधक चळवळ फक्त सामाजिक व आर्थिक क्षेत्रापुरती मर्यादित असून तिचा राजकारणाशी संबंध नाही अशी चर्चा त्या काळात होत असे. बागलांनी सार्वजनिक धर्मातील फुल्यांच्या वरील लिखानावरून सत्यशोधक चळवळीचा राजकारणाशी संबंध जोडू नये असे म्हणणे चुकीचे आहे असे म्हटले आहे. वरील शपथेवरून फुल्यांनी इंग्रजांचे अस्तित्व मान्य केलेले असले तरी त्यांनी इंग्रज राजवटीतील दोषांच्या संदर्भात जाहीर टिकाही केलेली होती. इंग्रज कांही काळ भारतात राहावे असे त्यांना वाटत होते. कारण येथील उच्चवर्णीय समाज शुद्रांना आपल्यांत सहजासहजी समाविष्ट करून घेणार नाही. इंग्रजांच्या राजवटीत स्त्री-शुद्रांच्या शिक्षणाचा प्रसार करता येईल. स्त्री-शुद्र व शेतकरी यांच्या अडाणीपणाचा लाभ घेवून त्यांचे सावकार उच्चवर्णीय शोषण करीत असतात अशी धारणा फुल्यांची होती. म्हणूनच त्यांची सार्वजनिक सभा राज्यनिष्ठ होती.

.....

## शेतक-यांचा असूड :

शेतक-यांची विदारक स्थिती पाहून फुल्यांनी "शेतक-यांचे आसूड " या पुस्तकांत तपशिलवार व विदारक चित्र मांडलेले आहे. ग्रामिण भागातील शेतक-यांच्या या प्राथमिक दुर्दशेची जबाबदारी त्यांनी ब्राहमण, नोकरवर्ग, सावकार, मारवाडी ,दलाल यांच्यावर टाकली आहे. पण याच वेळी वरिष्ठ इंग्रज अधिकारी आपल्या कर्तव्याकडे कसे दुर्लक्ष करीत आहेत , स्वत: ऐषआरामात राहून ब्राहमणी व्यापा-यांना लुटण्याची संधी देत आहेत. इंग्रज अधिकारी वेळेवर जर जागे झाले नाहीत आणि त्यांनी आपले ईश्वरदत्त कर्तव्य पार पाडले नाही तर त्यामुळे खुद्द इंग्रजी राजवटीलाच धोका निर्माण होईल असाही इशारा फुल्यांनी या पुस्तकांत ब्रिटीशांना दिला आहे.[८] अत्यंत विदारक विश्लेषण केलेले शेतक-यांच्या प्रश्नासंबंधीचे हे पुस्तक आजही महत्वाचे वाटते. कारण शंभर वर्षापूर्वी फुल्यांनी शेतक-यांच्या संदर्भात केलेला हा विचार मुलगामी स्वरुपाचा वाटतो.

## शिक्षणासंबंधी सूचना :

प्रत्येक माणसाला किमान प्राथमिक शिक्षण तरी मिळावे हा विचार सर्वप्रथम फुल्यांनी मांडून त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न व आग्रह धरला. व्हीक्टोरिया राणीचे पुत्र डयुक ऑफ कॅनाट यांचा १८८८ साली पुण्यात दौरा झाला. यावेळी सोमवार पेठेतील चिपळूणकर वाडयात राजपुत्राचा सत्कार आयोजित करण्यांत आला होता. त्या प्रसंगी शेतकरी वेशात जोतीरावाने उपस्थित राहून राजपुत्रास सांगितले की, या ठिकाणी उत्तम पोषाखात उपस्थित असलेले लोक जनतेचे प्रतिनिधी नाहीत. देशातील बहुसंख्य जनतेचे हित तुम्हाला करावयाचे असेल तर लोकांना प्राथमिक शिक्षण देवून त्यांचे

....

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अज्ञान घालवा असा त्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून राणीसाहेबांना माझा निरोप कळवा.

१८९९ साली मुंबईत झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या प्रवेशद्दारासमोर शेतक-याचा भव्य पुतळा उभा करुन कॉंग्रेसचे शेतक-याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न जोतीरावाने केला होता.[९]

कोल्हापूरातील सत्यशोधक समाज :

१८९९ च्या सुमारास कोल्हापूर संस्थानात राजर्षि शाहु महाराजांच्या काळात वेदोक्त प्रकरण उपस्थित झाल्यानंतर ब्राहमणेत्तर वादास तोंड फुटले. यामुळे या वातावरणातच ११ जानेवारी १९११ रोजी सत्यशोधक समाजाच्या शाखेची स्थापना करण्यांत आली. या शाखेच्या अध्यक्षपदी भास्करराव जाधव, उपाध्यक्षपदी आण्णासाहेब लठ्ठे व कार्यवाह हरिभाऊ चव्हाण यांची निवड करण्यांत आली. सत्यशोधक समाजाच्या कार्यालयासाठी शाहु महाराजांनी गंगावेशीत जागा दिली.[१०]

कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना होण्यापूर्वी १८९० सालीच जोतीराव फुलेंचा मृत्यु झाला होता. त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या कार्याची गती मंदावली होती. कोल्हापूरातील स्थापनेनंतर तीनच महिन्यांनी १७ एप्रिल १९११ रोजी पुण्यात सत्यशोधक समाजाचे पहिले अधिवेशन आयोजित करण्यांत आले होते. या अधिवेशनात समाजाची पुढील तत्वे निश्चित करण्यांत आली.

१. मानवांचा माय-बाप देव असून सर्व माणसे त्यांची लेकरे आहेत.

.....

२४ आईला भेटण्यास व बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची गरज नसते त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित किंवा गुरूजीची गरज नाही.

३. वरील तत्वप्रणाली मान्य असणा-या कोणालाही सत्यशोधक समाजाची सभासद होता येते.

कोल्हापूरातील सत्यशोधक समाजाचे क्रियाशील सभासद म्हणून खंडेराव बागल काम करीत होते. त्यामुळे माधवराव बागल या विचाराकडे आकर्षित झाले. त्यांनी आपले सत्यशोधकी विचार शेवटपर्यन्त जोपासले. फुले पुरस्कृत सामाजिक, धार्मिक व राजकीय आंदोलनाचे तिहेरी तत्व त्यांनी अंगिकारिले. यातूनच अस्पृश्यता नष्ट करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. शेतकरी कामगार यांच्या शोषणमुक्त राज्याच्या कल्पनेचा पुरस्कार या विचारातूनच केला.

माधवराव बागलांनी " स्वराज्याचा शत्रू व सत्यशोधकांना इशारा " किंवा " नव्या पिढीचे राजकारण " ही दोन पुस्तके सत्यशोधक तत्वज्ञानानुसार लिहिली. १९३३ साली शाहू सत्यशोधक समाजाच्यावतीने प्रसिध्द करण्यांत आलेल्या हीरक महोत्सव ग्रंथाचे संपादन त्यांनी केले.

स्वराज्याचे शत्रू या पुस्तकांत बागल म्हणतात, ब्राह्मणांनी लेखानी उगारून शेतक-यांची बुध्दी बोथट केली आहे. त्यांनी दगडाचे देव निर्माण करून ग्रंथ देवाने निर्माण केले असे सांगून अज्ञानी शेतक-यांना पिकासाठी, पावसासाठी देवाचा धावा करावयास लावले. त्यांनी आपल्याकडे ह दलाली घेतली आहे. समाजातील अस्पृश्यता व जातीभेद नष्ट करावयाची असेल तर आंतरजातीय विवाह व सहभोजन करावे लागेल.[१२]

......

सत्यशोधाकांना इशारा या ग्रंथात देवून ते म्हणतात, सत्यशोधाक हे ठराविक मर्यादेत करता येणार नाही, तसा निर्बंध कोणासही घालता येणार नाही. मानवाच्या निर्माण कर्त्याने सर्व मानव स्त्री-पुरूषास धर्म व राजकीय स्वातंत्र्य दिलेले आहे. एखादा मानव किंवा मानवाची टोळी एखाद्यावर जबरी करू शकत नाही. देशाची परराष्ट्र व्यवहाराची कल्पना नाहीशी होवून सर्व मानवात सहकार्य निर्माण होईल असा प्रयत्न केला पाहिजे. सर्व धर्मांना एकत्र आणणारा विश्वव्यापी धर्म निर्माण केला पाहिजे. हा फुले यांच्यासारखाच मानवतावादी विचार माधवराव बागलांनी आपल्या या पुस्तकांत व्यक्त केलेला आहे. सत्यशोधाक हिरक महोत्सव ग्रंथात बागल म्हणतात, सत्यशोधाक समाजाचे संस्थापक जोतीराव फुले असले तरी त्यांच्यापुढे समाज जात आहे. सत्यशोधान चालू राहणार म्हणून बदलत्या परिस्थितीप्रमाणे धोरण बदलावे. समाजातील स्वार्थ, कृत्रिम विषमता काढून समता व स्वातंत्र्य गाठणे हे ध्येय असावे.[१३]

जोतीराव फुल्यांनी अस्पृश्य समाजाला समतेची वागणूक मिळवून देण्याचे कार्य सातत्याने केले. बागलांनी देखिल या क्षेत्रांत प्रथम कार्य केले. नंतर कामगार चळवळ व राजकीय क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्यात प्रारंभ केला. जोतीराव फुल्यांनी जसा उच्चवर्णीय मित्राच्या लग्न वरातीत अपमानीत व्हावे लागण्याचा प्रसंग आला तसाच प्रसंग माधवरावांना वडिलांच्या सोबत दौऱ्यांत गेले असताना ब्राह्मण घरात दोन पंक्तीला जेवण्यास वेगवेगळे बसवून आला. खंडेराव बागलांनी त्या कुलकर्णी नामक गृहस्थाची कानउघाडणी करून जेवण न करता परत येण्याचे ठरविले. या प्रसंगाचा माधवरावांच्या बालमनावर परिणाम झालेला दिसतो.[१४]

.....

बागलांच्या घरी वाघमारे नांवाचा दलित समाजातील विद्यार्थी जेवणास येत होता. जेवणावेळी त्याला व्हरांडयात बसवून इतर मंडळी घरात जेवण करीत असत. एकेदिवशी माधवरांवाने आपल्या मातोश्रीकडे यासंबंधी तक्रार केली. त्याला आमच्यासोबत जेवण्यास बसू दे असा आग्रह धरला पण मातोश्रीने त्याना दाद न दिल्यामुळे स्वत:चे ताट घेवून माधवराव वाघमोरे सोबत दोन-तीन दिवस जेवले. यानंतर वाघमोरेस घरात प्रवेश देण्यास सुरुवात झाली. बाल माधवरावांने आपला हट्ट पूर्ण करुन घेतला.[१५]

## दौ-यातील अनुभव :

१९३० च्या सुमारास बागल खादीच्या प्रचारार्थ ग्रामीण भागात व्याख्याने देत असत. व्याख्यानातून स्पृश्य अस्पृश्य भेद नष्ट करावा असे आवाहन ते करीत असत. या दौ-यातच येल्लूर गांवी गांवप्रमुखाने अस्पृश्याबाबत बोललात तर गांवात जागा मिळणार नाही असे बागलांना बजावले. त्यावर बागलांनी आपण अस्पृश्य वस्तीत सभा घेवून तेथेच मुक्काम करु असे सांगितल्यावर पुढील कार्यक्रम सुरळीत पार पडला.[१६] बागल आपल्या भूमिकेशी ठाम राहिले.

## जगदंबा मंदिर प्रवेश :

करवीर संस्थानात १९३२ पर्यन्त अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नव्हता. त्यासंबंधीचा कायदाही दरबारने केलेला नव्हता. यावेळी अस्पृशांना समतेची वागणूक देण्याकरिता मंदिर प्रवेशाचा कार्यक्रम जाहीर केला. त्याच्या प्रचारासाठी ७ ते ८ हजार पत्रिका शहरांत वाटण्यांत आल्या. २५.९.१९३२ रोजी माधवराव बागलांनी आपल्या घरी राहत असलेल्या वाघमारे या अस्पृश्य मुलाचा हात हातात धरुन जगदंबा मंदिरात अनेक अस्पृश्यासोबत प्रवेश केला.

.....

जगदंबा मंदिर प्रवेशानंतर बागलांनी आपला मोर्चा नृसिंहवाडी मंदिराकडे वळविला. दिनांक २.१०.१९३२ रोजी कोल्हापूरातून कांही अस्पृश्य व मराठा बोर्डिंगमधील कांही विद्यार्थी यांच्या तीन मोटारगाड्या भरून बागल नृसिंहवाडीस गेले व कांबळे नांवाच्या अस्पृश्य माणसाचा हात धरून बागलांनी दत्ताच्या पादुकावर फुले वाहिले व सहभोजन केले. यानंतर आठवडयाने ९.१०.१९३२ रोजी सत्यशोधक समाजातर्फे सभा बोलावून बागलांचे अभिनंदन करण्यांत आले. या चळवळीस दरबारने कोणताही अडथळा केला नाही. उलट अधिकारी वर्गाने सहकार्य केले. त्यानंतर थोडयाच दिवसांत गॅझेट प्रसिध्द करून सर्वांना मंदिरे खुली केल्याचे जाहिर केले.

बागलांच्या नेतृत्वाखाली असलेल्या प्रजा परिषादेचे बहुमत कोल्हापूर नगरपालिकेत होते. त्यावेळी त्यांनी सोनवणे या अस्पृश्य समाजातील कार्यकर्त्यांस नगराध्यक्ष बनवले. पुन्हा दलित माणूस नगराध्यक्ष झाला नाही.

मदत :
====

१९४८ साली कोल्हापूर संस्थानात बागल मंत्रीमंडळ सत्तेवर असताना आंबेडकरांनी बागलांकडे मुंबई भेटीत सामाजिक कार्याकरिता बागल सरकारकडे आर्थिक मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती ती अपेक्षा बागलांनी पूर्ण केली होती.

सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्यांना आर्थिक मदत करण्याची बागलांची इच्छा होती. १९४८ साली डी. एस. नार्वेकर सत्यशोधक समाजाचे कार्य मोठया जिद्दीने करीत होते. माधवरावांनी बागल मंत्रीमंडळाकडून नार्वेकरांना बारा हजार रूपये मदत देवू केलेली होती

.....

पण नार्वेकर सक्रीय राजकारणात पडल्यामुळे त्यांचे कार्य मंदावले. अशाप्रकारे कार्यकर्त्यांना चळवळीत मदत केली पाहिजे या मताचे बागल होते. आपापल्या परीने ते मदत करीत असत. [१७]

मिश्र विवाह :
=========

अस्पृश्यता व जातीयवाद नष्ट करण्यासाठी मिश्र विवाह झाले पाहिजेत असे बागलांचे ठाम मत होते. त्याप्रमाणे त्यांनी कांही विवाह घडवून आणले. त्यांत आत्माराम पाटील (मराठा) व पिंगळे (ब्राह्मण) ,इनामदार (मराठा) व वन्य जातीतील वधू, हवेरी (लिंगायत) व अस्पृश्य वधू हे विवाह सत्यशोधक पध्दतीने ब्राह्मण पुरोहिताशिवाय बागलांनी लावले. शेवटपर्यन्त मिश्र विवाहाच्या कार्यक्रमाचा बागलांनी सक्रिय पुरस्कार केलेला होता. [१८]

नास्तिक बागल :
===========

माधवराव बागलांनी अस्पृश्यासाठी जगदंबा व नृसिंहवाडी मंदिरात प्रवेश केला असला तरी त्यांचा देवावर विश्वासच नव्हता. इतर हिंदु प्रमाणे अस्पृश्यांना तोच हक्क मिळावा हाच हेतु मंदिर प्रवेशामागे होता. ईश्वरावरील विश्वास उडण्यास कारण म्हणजे बागलांच्या आईच्या आजारात तिला आराम पडावा म्हणून त्यांनी परमेश्वराची निष्ठापूर्वक पुजा व आराधना केली पण आजारातच आई गेल्यामुळे त्यांचा परमेश्वरावरील विश्वासच संपुष्टात आला. [१९] त्यांनी आपली नास्तिकपणाची भूमिका वारंवार स्पष्ट केलेली आहे.

ज्ञानप्रकाशामधील लेख :
================

बागलांचे मत सत्यशोधक समाजाची चळवळ व्यापक बनली पाहिजे. फुलेंच्या काळात एक देव मानला असला तरी आता देव मानण्याची

.....

गरज नाही. या भूमिकेतून बागलांनी १९३१ मध्ये ज्ञानप्रकाशमध्ये पुढील आशयाचा लेख लिहिला होता. " फुल्यांचा कृत्रिम भेदभावावर कटाक्ष दिसतो. त्यात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय-ही भेदभावाचा समावेश होतो. त्यांचा ब्राहमण पुरोहित किंवा दलाल जसा नको तसा शाहू महाराजांच्या विचाराप्रमाणे आपल्या जातीतीलही पुरोहित नको. ईश्वराचे अस्तित्व सर्वांवर लादता येणार नाही कारण त्याचे अस्तित्व अद्याप कोणालाही जाणवलेले नाही. सत्यशोधक पूर्णत: नास्तिकसुध्दा असू शकतो." या लेखानंतर बागलांना सत्यशोधक समाजातून निलंबित करण्याचा प्रयत्न कांहीजणांनी केला पण तो बारगळला. बागलांच्या मताप्रमाणे राजकीय विचार सत्यशोधक समाजात करण्यास विरोध होता, कारण समाजास सरकारची मदत मिळत होती.[२०]

बागलांच्यावरील लेखामुळे सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांत खळबळ निर्माण झालेली होती. त्याचे प्रगटीकरण कोल्हापूरातील एक सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते श्री रामचंद्र यादव यांनी ऑक्टोबर १९३३ मध्ये "सकाळ" वृत्तपत्रात बागलांना अनावृत्त पत्र लिहून कांही प्रश्न उपस्थित केलेले होते. त्या प्रश्नांची उत्तरे पुढीलप्रमाणे देवून बागलांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली होती.

प्रश्न : आपण सत्यशोधक समाजाचे सदस्य आहांत काय?

उत्तर : सभासद आहे.

प्रश्न : सर्वसाक्षी सत्य स्वरूप जगाचा निर्भक अशा परमेश्वराचे स्वरूप आपण मानता काय ?

उत्तर : सर्वसाक्षी सत्य स्वरूप जगाचा निर्भक परमेश्वर या सामान्य

.....

गृहस्थाची अद्याप कांही माझी भेट झाली नाही. त्यामुळे त्याचे ठावठिकाण आणि अस्तित्व मला माहित नाही आणि म्हणून देव मानत नाही.

प्रश्न : राज्यकर्त्यांशी राज्यनिष्ठेने वागेन असे सत्यशोधक समाजाच्या प्रतिज्ञेत आहे, तसेच हा समाज लोकांची फक्त धार्मिक आणि सामाजिक उन्नती करण्याकरिताच आहे हे आपणास माहित आहे काय ?

उत्तर : सत्यशोधनाचा व राज्यनिष्ठेचा अर्थाअर्थी संबंध नाही. लोकांची राज्यनिष्ठा व राज्याची लोकनिष्ठा या गोष्टी परस्परावलंबी आहेत. त्याला प्रतिज्ञेची आवश्यकता नाही आणि समाजाचे नियम अबाधित नाहीत. परिस्थीतीला धरून बदलावे लागतात तसेच मी कोणताही धार्मिक विधी घरी पाळत नाही. समतेचे तत्व पाळतो म्हणून समाज सत्ताक राज्यपध्दती हवी असे मी मांडतो. धार्मिक व सामाजिक बाब राजकारणापासून अलिप्त ठेवणे आजकाळ अशक्य आहे आणि सत्यशोधनाचे कार्यक्षेत्र ठराविक मर्यादेपुरते राहू शकणार नाही. कायद्याचा संबंध आला की राहकारण येतेच.[२१]

१९४९ साली बागल शेतकरी कामगार पक्षात असताना भास्करराव जाधवांनी सत्यशोधक समाजाची परिषद आयोजित केलेली होती. या परिषदेत माधवरावांनी पुढील ठराव मांडले होते.

१. सत्यशोधक समाजाच्या सभासदाने आपले लग्न कोणत्याही धार्मिक पध्दतीने न करता नोंदणी पध्दतीने करावे.

२. यापुढे सत्यशोधक समाजाने देवा धर्माच्या गुलामगिरीतून संपूर्ण मुक्त झाले पाहिजे. फुल्यांनी त्यावेळी त्या काळातील परिस्थिती

.....

पाहून शंभर देव नकोत एकच देव असावा ही पुरोगामी विचारसरणी मांडली. आता याही पुढे जाऊन देवाचे उच्चाटन केले पाहिजे म्हणून देव नको.

या ठरावापैकी पहिला ठराव संमत झाला तर दुसरा ठराव फेटाळण्यात आला.[२२] वरील लेख, प्रश्नोत्तर ठराव याव्दारे बागलांनी देवांच्या संदर्भातील आपली भूमिका स्पष्ट मांडलेली दिसते.

पंढरपूर सत्याग्रहास विरोध :

पंढरपूरच्या देवालयात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी साने गुरूजी, सेनापती बापट यांनी सत्याग्रह सुरु केला. या सत्याग्रहात बागलांना सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले होते. या सत्याग्रहात सहभागी होण्यास बागलांनी नकार दिला. कारण या संदर्भात बागल म्हणतात, देवाविषयीच्या अंधश्रध्देमुळे बहुजन समाजाचे अतोनात नुकसान झाले. आर्थिक व बौध्दीक स्वरूपाचे नुकसान झाले. अज्ञानामुळे आम्ही बडव्यांना लाखों रूपये दिले. त्यावर त्यांनी माडया बांधल्या. आपल्या बायका सोन्यानी मडविल्या. आता अस्पृश्याकडून पैसा मिळवून देऊन त्यांची आणखी भर करणार काय ? देवालयात लोकांचे शोषण होते. अस्पृश्यांना आता देवाला जाऊ नका म्हणूनच स्पष्ट सांगा.[२३] असे आवाहन त्यांनी साने गुरूजी, बापटांना केले होते.

सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते समाजाचे तत्व पाळत नसतील तर बागल त्यांच्यावर कठोर टिका करीत असत. १९७२ साली बाळासाहेब देसाईनी मंत्रीपदाचा राजिनामा दिल्यानंतर शिवनेरकरांने त्यांना सत्यशोधक समाजाचा अध्यक्ष बनविले. त्यांनी २४ सप्टेंबर १९७२ रोजी सत्यशोधक परिषद आयोजित करून त्यात बागलांचा सत्कार

.....

करण्यांत आला. या सत्कार प्रसंगी बागलांनी कार्यकर्त्यांवर पुढीलप्रमाणे टिका केली. फुले-शाहू-आंबेडकर यांची विचारसरणी प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपण काय करणार आहात हा खरा प्रश्न आहे. तुम्ही समाजात क्रांती करावयास निघाला आहात ना मग समाजाला कांही सांगण्यापूर्वी तुम्ही आत्मसंशोधन करा. तुमच्यातील जाती भेद गेला कां ? फुल्यांनी सांगितले मूर्ती पुजा करू नका, अंधश्रध्दा काढून टाका पण इकडे फुल्यांचे अनुयायी समजून तिकडे टाळ कुटीत पंढरीला जातात. पंढरीला जावून सत्यशोधन करणारे म्हणविणार कां ? तुमच्यापैकी कितीजणांच्या घरी मूर्त्या आहेत ? त्या जर असतील तर लोकांची म तुम्ही फसगत करीत आहात.[२४]

अशाप्रकारे माधवराव बागलांनी आपल्या लिखानातून, भाषणातून व व्यक्तीगत आचरणातून फुल्यांच्या वैचारिक प्रेरणेने सत्यशोधक पध्दतीचा पुरस्कार जाहिररित्या केला. त्यांच्या प्रत्येक कृतीत व विचारात सत्यशोधक विचाराचा प्रभाव आपणास जाणवतो. " शेतकरी कामगार " राज्य पध्दतीचे व समाजसत्तावादी राज्याचे विचार फुल्यांच्या प्रभावामुळेच माधवरांव बागल सातत्याने मांडत. त्यादृष्टीने आपली राजकीय चळवळ चालविलेली होती.

### ब्राहमणेत्तर पक्ष :

राष्ट्रवादी चळवळीचा वाढता प्रभाव व पहिल्या महायुध्दामुळे बदललेली परिस्थिती लक्षात घेवून २० ऑगष्ट १९१७ रोजी भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी ब्रिटीश सरकारचे हिंदुस्थानविषयक धोरण जाहिर केले.

ब्रिटीश साम्राज्याचा अविभाज्य घटक असलेल्या प्रातिनिधीक स्वायत्त सरकार स्थापन करण्याचा हेतु मॉंटेग्यू यांनी बोलून दाखविला.

.....

त्यासाठी हिंदी जनतेच्या राज्यकारभारात हळूहळू सहभाग करुन घेतला जाईल अशी घोषणा केली. जनतेच्या हाती मर्यादित स्वरूपाचा हक्क का होईना अधिकार दिला जाणार असे स्पष्ट दिसू लागल्यानंतर राजकिय हालचालीस सुरुवात झाली. यानंतरच सत्यशोधक चळवळीचे राजकीय चळवळीत रूपांतर झाले. या पार्श्वभूमीवर सत्यशोधक समाजाच्या सभासदांनी १९१८ साली ऑल इंडिया मराठा लीग व डेक्कन रयत सभा या संघटनांची स्थापना केली. या संघटनांनी मराठा व मागासवर्गीयांसाठी राखीव जागा ठेवण्याची मागणी केली पण यात मागासवर्गीयांच्या राखीव जागांची मागणी मात्र मान्य झाली.[२६]

१२ डिसेंबर १९२० रोजी पुणे येथील जेधे मॅन्शनमध्ये ब्राहमणेत्तर संघाची स्थापना करण्यांत आली. या संघाचे उद्देश ब्राहमणांचे सर्व क्षेत्रातील वर्चस्व नष्ट करणे हे होते. टिळकांच्या सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात असलेल्या प्रतिगामी धोरणामुळे ब्राहमणेत्तर पक्ष कॉंग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहिला. पण पुढे गांधींच्या उदयानंतर ब्राहमणेत्तर पक्षात फूट पडून जेधे कॉंग्रेसमध्ये सहभागी झाले. केशवराव जेधयांचे ब्राहमणेत्तर पक्षाचे नेते भास्करराव जाधव यांच्या सोबत कांही धोरणामुळे मतभेद झाले ते पुढीलप्रमाणे आहेत.

इंग्रज सरकारशी एकनिष्ठ राहून त्यांच्या मर्जीने कायदे मंडळाचे सदस्यत्व व मंत्रीपद मिळवावयाचे आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसने चालविलेल्या स्वातंत्र्य चळवळीस विरोध करावयाचा या ब्राहमणेत्तर पक्षाच्या धोरणास १९२६-२७ पासून केशवराव जेधे, भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे यांनी विरोध केला. १९२२

.....

साली भास्करराव जाधवांना मुंबई कायदेमंडळातील सर कावसजी जहांगीर यांच्या मोकळ्या झालेल्या जागेवर सरकारतर्फे सदस्य म्हणून नियुक्त केलेले होते.[२७]

## सायमन कमिशन बहिष्कार :

१९२७ साली राजकीय हक्कांच्या शिफारसी करिता सायमन कमिशन भारतात आले होते. त्यात एकाही भारतीयाला सदस्यत्व नाही म्हणून काँग्रेसने बहिष्कार टाकला. ब्राहमणेत्तर पक्षाने-ही त्यावर बहिष्कार टाकावा असा ठराव ३० डिसेंबर १९२७ रोजी पुणे येथे झालेल्या बैठकीत केशवराव जेधे व भाऊराव पाटील यांनी मांडला. या ठरावास भास्कररावांनी विरोध करुन बैठकीत हा ठराव फेटाळून लावला व सरकार धार्जिने धोरण भास्कररावांनी अवलंबिल्यामुळे ब्रिटीशानी त्यांना सप्टेंबर १९२९ मध्ये शेतकरी अबकारी खात्याचे मंत्री केले होते.[२८] १८ ऑगष्ट १९२९ रोजी जेधे मॅन्शन येथे भरलेल्या बैठकीत शाहू ब्राहमणेत्तर पुढा-यांचे लक्ष फक्त कौन्सिलकडेच वेधल्यामुळे बाहेरील कार्य थंडावलेले आहे. निवडणूकीच्यावेळीच हालचाल करणा-या व अधिकार पदे मिळविणा-या जाधव गटावर जेधे गटाने टिका केली.[२९]

## काँग्रेसची स्वातंत्र्य घोषणा :

भारतात पूर्ण स्वातंत्र्य मिळविणे हे काँग्रेसचे ध्येय आहे असे डिसेंबर २९ मध्ये नेहरुंनी जाहीर करुन २६ जानेवारी १९३० हा "स्वातंत्र्य दिन" म्हणून साजरा करण्यांत आला.[30] गांधींच्या नव्या आंदोलनास सुरुवात होईल असे वातावरण निर्माण झाले. यावेळी भास्करराव गटाने हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा दिल्यास पुन्हा पेशवाई येईल असे मत

.....

व्यक्त केले. पण यावेळी बहुसंख्य ब्राहमणेत्तर पक्षातील तरूण कार्यकर्ते जाधव गटावर नाराज होते. १९३० च्या प्रारंभी व-हाड मध्यप्रांत तरूण ब्राहमणेत्तर कार्यकर्त्यांची वर्ध्यात बैठक पार पडली. या बैठकीत राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य मिळविण्याचे ध्येय जाहीर करून गांधींच्या चळवळीस पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला.[३१]

या काळात बहुसंख्य ब्राहमणेत्तर कार्यकर्ते कॉंग्रेस चळवळीकडे आकर्षित झालेले होते. त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सहभागी व्हावयाचे होते. १९३० च्या कायदे भंग चळवळीच्यावेळी केशवराव जेधे, भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे यांनी १२ एप्रिल रोजी दांडी येथे होणा-या गांधींच्या नेतृत्वाखालील मिठाचा सत्याग्रहाचा पुणे परिसरात प्रचार केला होता. या भूमिकेस भास्कररावांनी विरोध केला.[३२] या सत्याग्रहाच्यावेळी केशवराव जेधेंना १९ नोव्हेंबर १९३० रोजी अटक होवून तीन महिने सक्तमजूरी व एक हजार रूपये दंडाची शिक्षा झाली.[३३]

१५ फेब्रुवारी १९३१ रोजी केशवराव जेधेंची सुटका झाल्यानंतर त्यांनी गांधींचे नेतृत्व मान्य केले. याचवेळी महाराष्ट्रातील बहुसंख्य बहुजन समाज स्वातंत्र्य लढयात सहभागी झालेला होता.[३४] जेधेंच्या कॉंग्रेस सहभागानंतर ब्राहमणेत्तर पक्षाचे अस्तित्व नाममात्राच शिल्लक राहिले होते. गांधींचे नेतृत्व मान्य करून चळवळीत सहभागी होण्याचा ग्रामीण महाराष्ट्रात जोर वाढला व चळवळ खेडयात उभी राहिली.

## बागलांची भूमिका :

केशवराव जेधेंच्या कॉंग्रेस प्रवेशानंतर कोल्हापूर संस्थान प्रजा परिषादेचे व सत्यशोधक समाजाचे नेते माधवराव बागलांनी

.....

"हंटर" या वृत्तपत्रांत लेख लिहून ब्राह्मणेत्तर पक्षातील सरकार धार्जिण्या भास्करराव जाधव गटावर टिका केली. या लेखातील आशय पुढीलप्रमाणे आहे.

कौन्सिल निवडणूका जशा जवळ येतील तशी ब्राह्मणेत्तर पक्षाची ब संघटना सक्रीय होते. तोपर्यन्त सर्व थंड असते. निवडणूकीचा वारा असला की शेतक-याबाबत पान्हा फुटतो. तोपर्यन्त प्रेतवत शांतताच असते. सभा भरवण्याचा मोठा कार्यक्रम म्हणजे स्वत:ची स्तुती व इतरांची निंदा नालस्ती करणे. ब्राह्मणेत्तर पक्षाची विधायक कामगिरी थोडी बहुत झाली ती विठ्ठल रामजी शिंदे, पंढरीनाथ पाटील, आनंद स्वामी, भाऊराव पाटील, केशवराव जेधे या नेत्यांच्या हातूनच. कौन्सिलात निवडून गेलेल्या डिग्रीवाल्यांच्या हातून त्यामानाने फारसे कांही झाले नाही. क मोठ मोठया नोक-या व दिवाण पद यापासून शेतक-याचा कितीसा फायदा झाला आहे याचा त्यांनीच विचार करावा असे या लेखात नमूद करण्यांत आले होते.[३५]

१९३० मध्ये माधवराव बागलांनी म्हटले होते की, अनुभवावरून मला असे वाटू लागले आहे की, ब्राह्मणेत्तर पक्षातील लोकांनी आपला सवता सुभा स्थापन न करता एकजुटीने कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला तर संख्या बळावर संघटनेत वर्चस्व स्थापन करता येईल. पण भास्करराव याला अनुकूल नाहीत. विठ्ठल रामजी शिंदे, जेधे, भाऊराव पाटील कॉंग्रेसमध्ये सक्रीय होत आहेत ही चांगली बाब आहे.[३६]

पुणे येथे २७ नोव्हेंबर १९४५ रोजी फुले पुण्यतिथी निमित्त सत्यशोधक समाजातर्फे बागलांचे व्याख्यान आयोजित करण्यांत आले होते. त्यात बागल म्हणाले की, आज कॉंग्रेसच खरी सत्यशोधक आहे.

.....

गांधी-नेहरू सत्यशोधक आहेत. त्यांना सर्व भारतीयांनी सहकार्य केले पाहिजे.[३७]

सत्यशोधक चळवळीचा प्रवाह राष्ट्रीय चळवळीत सहभागी होवून त्या चळवळीत आपल्या विचारांचे वर्चस्व प्रस्थापित व्हावे व राष्ट्रीय जीवनात बहुजन समाज अलग न पडता समरस व्हावा ही बागलांची सत्यशोधक भूमिका सातत्याने राहत गेली. प्रत्येक प्रश्नाचा त्यांनी सत्यशोधक वृत्तीने विचार केलेला दिसतो.

## सत्यशोधक व संयुक्त महाराष्ट्र :

सातारा रोड येथे २५ मे १९५८ रोजी पार पडलेल्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेत बोलताना बागल म्हणाले की, सत्यशोधकाच्या कार्यावर मर्यादा घालता येणार नाही. जेथे अन्याय असेल तेथे तो उडी घेणारच. म्हणून व्दिभाषिक हा महाराष्ट्रीयांना मोठा अन्याय वाटत आहे. हा अन्याय दूर करण्यासाठी सत्यशोधकांनी या चळवळीत भाग घेतला पाहिजे[३८] अशी स्पष्ट भूमिका बागलांनी मांडली होती.

महाराष्ट्रात भाषिक प्रश्नामुळे सुरू झालेल्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्यापूर्वी माधवराव बागलांनी संस्थान विलीन झाल्यानंतर आपली राजकीय भूमिका निश्चित करून शेतकरी कामगारांचे राज्य ही घोषणा करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षात प्रजा परिषदेचे विलीनीकरण करून प्रवेश केलेला होता.

## शेतकरी कामगार पक्षाचा उदय :

महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीतून तयार झालेला बहुजन समाजातील मोठा वर्ग कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभागी

.....

झालेला होता. गांधींच्या नेतृत्वाचा प्रभाव त्या काळात मोठया प्रमाणावर होता.

१५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कॉंग्रेस नेतृत्वात सत्ता प्राप्तीसाठीची स्पर्धा सुरु झाली. कॉंग्रेस पक्षावर भांडवलदार, जमीनदार, सरंजामदार, उच्चकुलीन घराण्यातील लोकांची पकड असल्यामुळे या पक्षात शेतकरी कामगारांना फारसे स्थान नाही ही भावना महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या नेत्यात निर्माण झाल्यामुळे त्यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून नवा राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. १३ जून १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्षाची या नेत्यांनी स्थापना करुन आपली भूमिका मांडणारा ठराव संमत केला. या ठरावास "दांभाडी प्रबंध" म्हणूनच ओळखले जाते. या पक्षाच्या संस्थापकात केशवराव जेधे, शंकरराव मोरे, र. के.खाडीलकर, भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव यांचा प्रमुख नेत्यात समावेश होता. ग्रामीण भागात या पक्षाचा उत्तम प्रतिसाद मिळत होता.

कोल्हापूर संस्थान शाहूजीमहाराजांनी मुंबई राज्यात विलीन केल्यानंतर बागलांना प्रजा परिषदेचे विसर्जन करुन कोणत्या तरी राजकीय पक्षात सहभागी होणे आवश्यक होते. यशवंतराव चव्हाणांनी बागल स्थानबध्द असताना कॉंग्रेसमध्ये येण्याचे आवाहन केलेले होते. पण कॉंग्रेसमध्ये वल्लभभाई पटेल सारखे भांडवलदारांचे समर्थक असल्यामुळे त्यांनी नकार दिला. शेतकरी कामगार राज्याची कल्पना स्विकारलेल्या शेतकरी कामगार पक्षात फेब्रुवारी १९४९ मध्ये प्रवेश केला. पक्षात जाण्यापूर्वी बागलांनी शंकरराव मोरेंना प्रश्न विचारुन पक्षाची समाजवादावर अटळ निष्ठा राहिल असे वदवून घेतले होते. या प्रश्नात डाव्या विचारांची

.....

राष्ट्रीय स्तरावरील आघाडी, साधनांचा अवलंब, मतांची विभागणी हे विचारले होते. काँग्रेसला पर्याय म्हणून डावा पक्ष किंवा आघाडी बागलांना अभिप्रेत होती.[३९]

शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केल्यानंतर १९५२ च्या निवडणूकीत त्यांच्या नांवाची उमेदवार म्हणून पक्षात चर्चा झाली, जेधे - मोरे यांनी आग्रह धरला पण उमेदवारी नाकारुन अधिकार पद घेण्याचे टाळले. या निवडणूकीत कोल्हापूर जिल्हा व मुंबई राज्य, मराठवाडा या विभागात बागलांनी दौरा काढून पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार केला.[४०]

निवडणूकीपूर्वी पक्षात दत्ता देशमुख गटाने मोरे जेधे गट प्रतिक्रांतीकारीवादी आहेत असा आरोप केल्यामुळे जेधे मोरे गटाने देशमुख गटास फुटफाडे, अतिजहाल, साहसवादी आहेत असे म्हटले होते. शेवटी १४ ते १६ एप्रिल १९५१ रोजी पक्षाच्या जनरल कौन्सिलची बैठक होऊन दत्ता देशमुख ,नाना पाटील, काकासाहेब वाघ यांची हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला. पुढे ४ ऑक्टोबर १९५१ रोजी दत्ता देशमुख गटाने कामगार किसान पक्ष स्थापन केला.[४१]

शेतकरी कामगार पक्षात मतभेद :

१९५२ च्या लोकसभा निवडणूकीत पुण्यातून केशवराव जेधे गाडगीळांविरुध्द पराभूत झाले. शंकरराव मोरे सोलापूरातून विजयी झाले. यानंतर जेधे-मोरे वादास प्रारंभ झाला. जेधे गटाने मोरे गटावर जेधेंना पुण्यात उभे करुन त्यांचा बळीचा बकरा बनविला असा आरोप करुन मोरेंनी पक्षाची यंत्रणा आपल्याच मतदार संघात राबविली

.....

असे म्हटले होते. जेधेंचे समर्थन करणा-या "सारथी" वृत्तपत्रातून शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस शंकरराव मोरे यांच्यावर टिका करणारा लेख प्रसिध्द केला. या वृत्तपत्राचे संपादक जेधेंचे चिरंजीवच होते.[४२]

या वादात केशवराव जेधेंनी १७ मे १९५२ रोजी पक्षाचा राजिनामा सरचिटणीस शंकरराव मोरे यांच्याकडे पाठवून आपली पक्षातील भूमिका जाहीर केली.

या काळात माधवराव बागलंही शेतकरी कामगार पक्षातील मतभेदामुळे व्दिधा मनःस्थितीत होते. त्यांनाही गटबाजीचा कंटाळा येऊन पक्ष सोडावा असे वाटत असताना पुन्हा आपण व्यक्तीगत राग लोभासाठी पक्षात गेलो नाही असाही विचार त्यांच्या मनात येत होता.

केशवराव जेधेंनी पक्षाचा राजिनामा दिला त्यावेळी म्हणजे ६ जून १९५२ रोजी शेतकरी कामगार पक्ष व समाजवादी पक्ष यांच्यावतीने भाववाढी विरोधात मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी बागलासह सर्व सत्याग्रहीना एक महिन्याची कैद व ५0 रूपये दंडाची शिक्षा झाली. सत्याग्रहीने दंड नाकारल्यामुळे पुन्हा आठ दिवस शिक्षेत वाढ झाली. कारागृहात असताना बागलांने पक्षाच्या ८0 सत्याग्रहीच्या सह्यानिशी केशवराव जेधेंना पत्र लिहून राजिनामा परत घेण्याचे आवाहन केले. या पत्रात पुढीलप्रमाणे आशय होता.

" आज आम्ही येथे आपल्या पक्षाचे ८0 लोक तुरूंगात आहोत या सर्वांच्यावतीने पुष्कळ विचार करून आम्ही आपणास पुढीलप्रमाणे विनंती करीत आहोत. आपण पक्षाचे एक संस्थापक व आधारस्तंभ आहात. शील, नीती, धैर्य, स्पष्टवक्तेपणा, निष्कपटपणा याचे आपण आदर्श असून महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे आवडते नेते आहात आमच्या सारखे असंख्य लोक भावनेने पक्षात आले पक्षाची भूमिका पूर्ण आकलन झाली नसताना जेथे केशवराव तेथे आम्ही याविश्वासने व प्रेमाने पक्षात आलो. आपल्या राजिनाम्याने आम्हा सर्वात निराशेचे

वातावरण उत्पन्न झाले आहे. कांहीच्या कृत्यामुळे आपणास चीड आली असतांना आम्हाला शिक्षा कां? आपण पक्ष स्थापन केला तो काहींच्या भिडस्तव, लोभास्तव की आम्हा जनतेच्या कल्याणासाठी ? अशावेळी आपण आम्हास सोडून जाऊ नये. आपल्या असंख्य अनुयायांच्या विचारास धुडकावू नये. आपण तर यावेच पण आपण दुभंगलेली घडी एक करावी व नाना पाटील वगैरे मंडळीना पुन्हा प्रेमाने आंत घ्यावे व शत्रूना वाटणारा राक्षसी आनंद नष्ट करावा. "

यावेळी रघुनाथराव खाडीलकर, यशवंतराव मोहिते, बराळे यांनीही केशवराव जेधेंना पत्र पाठवून राजिनामा परत घेण्याची विनंती केलेली होती. या सर्वांच्या विनंतीवरुन जेधेंनी आपला राजिनामा परत घेवून ३ ऑगष्ट १९५२ रोजी पक्षाच्या वाढदिवसानिमित्ताने झालेल्या कार्यक्रमांत परत पक्षाचे काम करण्याचे जाहीर केले होते. [४३]

११ ते १६ जून १९५३ रोजी सांगली येथे पक्षाचे अधिवेशन पार पडले. यावेळी पक्षाचे सरचिटणीस शंकरराव मोरे यांनी पक्षाचे ऐतिहासिक कार्य संपलेले असून पक्षाचे विसर्जन करावे अशी सूचना केली व ही सूचना मान्य नसल्यास आपणास पदावरुन मुक्त करावे अशी सूचना केली. जेधे गट पक्ष बांधणीत शिस्त ठेवत नाही असाही आरोप त्यांनी केला. ही सूचना जेधे व इतर गटाने फेटाळून मोरेंना पदमुक्त करुन सरचिटणीस पदी रघुनाथराव खाडीलकरांना नियुक्त केले. [४४]

खाडीलकरांची नियुक्ती झाल्यानंतर बागलांनी आपली नाराजी व्यक्त करणारी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, जेधे- मोरे पेक्षा खाडीलकर माझे जास्त स्नेही आहेत पण समाजाच्या मन:स्थितीचा विचार करता त्यांनी नेतृत्व स्विकारण्यापेक्षा बहुजन समाजातील व्यक्तीकडे नेतृत्व सोपवून आपण मार्गदर्शन करावयास हवे होते. [४५]

.....

२७ व २८ जानेवारी १९५३ रोजी पक्षाच्या राजकारण समितीची बैठक हैद्राबाद येथे झालेली होती. या बैठकीत जेधेंनी मोरेकडून पक्षाचा आर्थिक हिशोब मागितला. पण मोरेनी पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष जेधे व कार्यालय चिटणीस मालती तळपुळे यांची हिशोबाची जबाबदारी आहे असे मत व्यक्त केले. पुढे खाडीलकराने हिशोबाच्या वह्या मागूनही त्यांना दिल्या गेल्या नाहीत.

या सर्व वादाला कंटाळून केशवराव जेधेंनी २४ एप्रिल ५४ रोजी पक्षाचा राजिनामा देवून पुढे १५ ऑगष्ट १९५४ रोजी काकासाहेब गाडगीळ यांच्या सहकार्याने परत कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला.[४६] जेधेनंतर असंख्य नेते व कार्यकर्ते कॉंग्रेसकडे आकर्षित झाले होते.

## बागलांचा पक्षत्याग :

माधवराव बागलांना शेतकरी कामगार पक्षातील नेत्यांच्या गुणाबाबत आपुलकी वाटत होती पण त्यांच्या मतभेदासंबंधी तिरस्कार वाटत होता. या संदर्भात बागल म्हणतात, " प्रारंभीच्या काळात आमच्या पक्षाची ताकत मोठी होती, वाढत होती. तशीच वाढत गेली असती तर महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे स्थान अगदी डळमळीत झाले असते. केशवराव जेधेंची आजपर्यन्तची तपश्चर्या, लौकीक व लोकप्रियता स्वभावातील निर्मलता, धैर्य, धडाडी, नेकी व साधेपणा नांना पाटलांची खेडूतावरील असामान्य पकड, नम्रता जीवाची काळजी न करता काम करण्याची चिकाटी, शिस्त पालन, शिकण्याची तळमळ, भाषेतील माधुर्य सोपेपणा व प्रसंगावधान, याचबरोबर तुळशिदास जाधव , र. के. खाडीलकर, भाऊसाहेब राऊत, दत्ता देशमुख, व्ही. एन.पाटील, केशवराव पवार या असंख्य कर्तव्यवान व गुणसंपन्न नेत्यामुळे कॉंग्रेसला

.....

राज्यात हादरा बसत होता पण महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या दुर्भाग्याने या मुढा-यात व्देशाचा निंदेचा, अविश्वाचा कली थैमान घालू लागला. पक्ष निष्ठा, ध्येयनिष्ठा यापेक्षा व्यक्तीनिष्ठा ,प्रबळ झाली, मने कलुषित झाली हे वातावरण पक्षात तळापर्यंन्त पोहचून पक्ष दुभंगला.

यावरील गोष्टीचा सविस्तर विचार करुन पक्षाबाबत अत्यंत प्रेम असतानाही बागलांने जेधेनंतर १९५४ साली अखेर पक्ष सोडण्याचा निर्णय जाहीर केला.

पक्ष त्यागानंतरची भूमिका :
===================

माधवराव बागलांनी १९५४ मध्ये शेतकरी कामगार पक्ष सोडल्यानंतर अपक्ष राहण्याचे ठरविले. पण त्यांची मानसिक स्थिती व्दिधा अवस्थेत होती. या संदर्भात ते म्हणतात समाजवादी विचारांचे लोक कॉंग्रेसमध्ये गेले तर नेहरु व आज जे समाजवादी विचारांचे लोक कॉंग्रेसमध्ये आहेत त्यांचे हात बळकट होतील, नेहरुंच्या अलौकीकतामुळे व व्यक्तीमत्वामुळे भांडवलशाही धार्जिणा गट उघड डोके काढू शकत नाही, दबून आहे पण स्वस्थ नाही. म्हणून नेहरुंचे नेतृत्व बळकट केले पाहिजे. तसेच कम्युनिस्टांचा ध्येयवादी, व इष्ट चुका दाखविणारा पक्ष ही असलाच पाहिजे नाही तर कॉंग्रेसही हुकूमशाही संस्था होईल. कॉंग्रेसाध्यक्ष ठेबर यांची निवड ही त्यांचेच द्योतक आहे. कणखार व त्यागी लोकांनी कम्युनिस्ट पक्षात जावे पण अनेक डावे पक्ष असू नयेत.

या कालावधीत आमदार नारायणराव सरनाईक यांनी शिरोली येथे भाऊसाहेब हिरेंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत

.....

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

कॉंग्रेस प्रवेश केला. त्या सभेस बागल उपस्थित राहून त्यांनी भाषणही केले. यानंतर बागलांनी आपल्या निवासस्थानी नेहरूंचा फोटा लावला होता.[४८]

या काळात बागलांना डाव्या पक्षांची ऐकी व्हावी असे वाटत असे. पण परस्परातील मतभेदामुळे हे ऐक्य शक्य नव्हते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी नेहरूंच्या प्रतिकूल मताबाबत बागलांना त्यांच्यासंबंधी आकर्षण वाटूनही दुरावा वाटत होता. म्हणून त्यांनी त्या काळात आपण पक्षातीत राहून संयुक्त महाराष्ट्र चळवळीत काम करणेचा निर्णय घेतला. संयुक्त महाराष्ट्राची मागणी यशस्वीपणे पदरात पडल्यानंतर व बहुजन समाजाचे कॉंग्रेसमध्ये वर्चस्व निर्माण झालेले आहे. अशी खात्री वाटल्यानंतर बागलांनी लोकांना कॉंग्रेसला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

## संयुक्त महाराष्ट्राची मागणी :

भाषावार प्रांतरचनेची मागणी तशी ब्रिटीश अमदानीपासूनच होत होती. बंगालच्या फाळणीनंतर या मागणीस जोर आला. १९२० साली कॉंग्रेस पक्षाने या संदर्भात आपली भाषावार पुर्नरचनेसंबंधीचे धोरण जाहीर केलेले होते. प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणूक जाहीरनाम्यात याचा उल्लेख होता.

१९४० साली मराठी भाषिक जनतेचे एक राज्य करावे अशी मागणी सर्व प्रथम नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू केदार यांनी एका कार्यक्रमात केली होती.[४९] त्यानंतर १९४६ साली बेळगांव साहित्य संमेलनात या मागणीचा पुर्नउच्चार करण्यांत येवून त्यासाठी मुंबईत एक परिषद आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.[५0] या निर्णयानुसार

.....

२८ जुलै १९४६ रोजी बैठक घेवून शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षिय " संयुक्त महाराष्ट्र परिषाद" स्थापन करण्यांत आली. या परिषादेवर सर्व विभागातील प्रतिनिधीचा समावेश करण्यांत आला होता. या बैठकीत सर्व मराठी भाषिक विभागाचे एक राज्य निर्माण करण्याची मागणी करण्यांत आली होती. यानंतर १ व १४ एप्रिल १९४७ रोजी जळगांव येथे परिषादेचे अधिवेशन पार पडून कार्यकारी मंडळाची निवड करण्यांत आली. यात अध्यक्ष शंकरराव देव, उपाध्यक्ष ब्रिजलाल बियाणी, पुनमचंद रांका, दिगंबरराव बिंदू, पोतदार, जेधे, कार्यवाह - माडखोलकर, सहकार्यवाह नवरे, डॉ. अत्रोळीकर, वसंतराव नाईक, प्रमिला ओक, व कोषाध्यक्ष दा. वि. गोखले यांचा समावेश होता.[५१]

दार समिती :
=========

भाषावार प्रांतरचनेची मागणी पुढे येत असताना यासंबंधी घटना समितीत ही चर्चा सुरु झाली. यावर विस्तृत अभ्यास करुन शक्य तितक्या लवकर अहवाल मिळावा यासाठी घटना समितीचे अध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांनी १७ जून १९४८ रोजी " दार समिती"ची नियुक्ती केली.[५२] दार समितीपुढे संयुक्त महाराष्ट्र परिषाद, महाविदर्भ समिती, कम्युनिष्ट पक्ष व इतर संघटना व व्यक्तींनी ८ नोव्हेंबर १९४८ रोजी आपापले मते मांडली.[५३]

भाषिक प्रांताची मागणी संकुचित व प्रतिगामी स्वरुपाची आहे. तिच्यामुळे लोकांचे स्थलांतर वाढेल, रक्तपात, अत्याचार यामुळे देशाचे तुकडे पडतील, महाराष्ट्रातील लोक जुन्या सरंजामी व पुणेरीवृत्तीचे आहेत.

.....

मुंबईवर महाराष्ट्राचा मुळीच हक्क नाही, तिला कोणत्याच एका प्रांतात टाकता येणार नाही असा अहवाल दार समितीने १०.१२.१९४८ रोजी घटना समितीला सादर केला.[५४]

या समितीचा अहवाल प्रसिध्द झाल्यानंतर देशभर निषेध सुरु झाला. कॉंग्रेसलाही हा ठराव अनुकूल वाटत नव्हता. म्हणून २९ डिसेंबर १९४८ रोजी जयपूर येथे झालेल्या कॉंग्रेस कार्यकारिणी बैठकीत या अहवालावर चर्चा होऊन जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, पट्टाभी सितारामय्या यांची समिती नियुक्त करण्यांत आली. या समितीने दार समितीचा अहवाल व देशातील निर्माण झालेल्या समस्या विचारात घेवून अहवाल सादर करावा असे ठरविण्यांत आले.[५५]

जे. व्ही. पी. समितीचा अहवाल ५ एप्रिल १९४९ रोजी प्रसिध्द झाला. त्यांत भाषावार प्रांतरचना सध्याच्या स्थितीत बनवू नये अशी शिफारस होती. मात्र आंध्र प्रांत त्वरीत निर्माण करावा व यथावकाश मुंबई वगळून इतर मराठी भाषिकांचे महाराष्ट्र बनवावे अशी शिफारस करण्यांत आली होती.[५६]

या शिफारशी संयुक्त महाराष्ट्र परिषदेने अमान्य केल्या. परिषदेची अमरावती येथे माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली परिषद पार पडली. यात बागल म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्र हे खालच्या श्रमजीवी वर्गालाच फायद्याचे आहे. शेतकरी कामगार राज्य आणण्यात ही मागणी उपयुक्त आहे.[५७]

## अकोला व नागपूर करार :

यापूर्वी म्हणजे ८ ऑगष्ट १९४७ रोजी अकोला येथे एक बैठक होवून त्यात महाराष्ट्र घटक राज्य म्हणून मान्य करावे अशी मागणी

.....

करण्यांत आली. या बैठकीत मुंबई प्रांत व विदर्भातील नेते उपस्थित होते. यावेळी झालेल्या करारास अकोला करार म्हणून ओळखले जाते. या करारात संयुक्त महाराष्ट्र म्हणून एक प्रांत राहून त्यामध्ये मध्यप्रांत व-हाडातील मराठी भाषिक प्रदेशाचा व महाराष्ट्राचे उपप्रांत ठेवण्यात यावे व या उपप्रांताना अलग कायदे मंडळ व मंत्रीमंडळ राहून कांही विशिष्ट खाती त्याच्याकडे सोपविण्यात यावीत व आवश्यकता असेल व शक्यता असेल त्यावेळी उपप्रांतात घटक राज्य निर्माण करण्याचा अधिकार राहिल.[५८]

इ दरम्यानच्या काळात आंध्र राज्याची निर्मिती करावी म्हणून पोट्टी रामल्लू यांनी ५८दिवस उपोषण करून प्राण गमावले. यामुळे दंगली उसळल्या. शेवटी १९ डिसेंबर १९५२ रोजी लोकसभेत स्वतंत्र आंध्रची घोषणा करण्यात आली होती.[५९]

२८ एप्रिल १९५३ रोजी बेळगांवच्या सभेत बोलताना नेहरू म्हणाले की, आंध्राचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर एक वर्षाने अन्य प्रांतांचा विचार केला जाईल. यानंतर ब्रिजलाल बियाणी यांने स्वतंत्र विदर्भाची मागणी सुरु केली. ती टाळण्यासाठी २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर येथे बैठक घेवून कांही बाबीवर निर्णय घेण्यात आले. या निर्णयासच " नागपूर करार " म्हणून ओळखले जाते.

सध्याचे मुंबई, मध्यप्रदेश, हैद्राबाद राज्यातील सलग मराठी भाषिकांचे राज्य बनविण्यात यावे, शासन व कायदे मंडळ एकच असेल महत्वाची खाती व मंत्रीमंडळातील सहभाग सर्वांना समान दिला जाईल, विधीमंडळाचे एक तरी अधिवेशन नागपूरात होईल, उच्च न्यायालयाचे खांडपीठ करण्यांत येईल. आदी बाबींचा उल्लेख या करारात करण्यांत

.....

आला होता.या करारावर रामराव देशमुख, खोडकर, प. का. देशमुख शेषराव वानखोडे, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे आदि प्रमुख नेत्याच्या स्वाक्ष-या होत्या. देव व रामानंद तीर्थ बैठकीत हजर होते. पण त्यांनी स्वाक्षरी केली नाही. [६०]

काजल अली समिती :

भाषिक राज्य पुर्नरचना करण्यासाठी केंद्र शासनाने फाजल अली समितीची नियुक्ति केली. या समितीत पण्णीकर व कुंझरू हे फाजल अली सोबत सदस्य म्हणून काम करीत होते. [६१] या समितीस मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र असावे व त्यात विदर्भ, हैद्राबाद व मुंबई राज्यातील मराठी भाषिक विभागाचा समावेश करण्यात यावा अशी मागणी काणारे निवेदन संयुक्त महाराष्ट्र समितीने सादर केले.भाषिक राज्य जर अपरिहार्य होत असेल तर विदर्भ हे स्वतंत्र राज्य करावे अशी मागणी करणारे निवेदन बापूसाहेब अणे यांनी समितील सादर केले. [६२] संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या शिष्ट मंडळात भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण नानासाहेब कुंटे, एस. एम. जोशी, तुळशीदास जाधव व धनंजयराव गाडगीळ यांचा समावेश होता. [६३]

दरम्यानच्या काळात कोल्हापूर शहरात बसविण्यात आलेल्या महात्मा गांधीच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी भाऊसाहेब हिरेंना निमंत्रित करण्यात आले होते. त्यावेळी बोलतांना माधवराव बागलांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी झगडणा-या नेत्यांचा आम्ही आज गौरव करीत आहोत अशी भावना व्यक्त केलेली होती.

......

फाजल अली समितीचा अहवाल १० ऑक्टोबर ५५ रोजी प्रसिध्द करण्यात आला. यात विदर्भाचे स्वतंत्र राज्य व गुजरात प्रदेशासह मराठवाडा धरून व्दिभाषिक राज्याची शिफारस केलेली होती. विदर्भ वेगळे राज्य करावे असे सुचविले असले तरी मुंबई लगतच्या भाषिकांचे वेगळे राज्य करू नये व मुंबई प्रांतातील धारवाड विजापूर, बेळगांवह हे कानडी जिल्हे कर्नाटक राज्यात घालावेत अशी शिफारस करण्यात आली होती.[६५]

फाजल अली समितीचा अहवाल सादर झाल्यानंतर महाराष्ट्रात निषेध सभा झाल्या. १७ ऑक्टोबर ५५ रोजी दिल्लीत नेहरू – देव चर्चा झाली. त्यात गुजरात, विदर्भासह महाराष्ट्र वमुंबई असे तीन राज्य करण्याची सूचना केली. पण देवांनी मात्र नकार दिला. यावेळी अंतिम निर्णय झाला नाही. २२ ऑक्टोबर ५५रोजी झालेल्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या बैठकीत विदर्भासह विशाल व्दिभाषिक राज्याची मागणी करणारा ठराव संमत केला.

२३ ऑक्टोबर ५५ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या बैठकीत देवांनी मांडलेल्या व्दिभाषिक राज्याच्या प्रस्तावाला विरोध करण्यात आला.[६६]

फाजल अली समितीचा अहवाल प्रसिध्द झाल्यानंतर कोल्हापूरात गोंधळ दंगे होवू नयेत म्हणून बागलांनी शांतता प्रस्तापित करण्यासाठी २६ सप्टेंबर ५५ रोजीच एक पत्रक प्रसिध्द केलेले होते. यात शांतता राखण्याचे काम तालीमसंघांनी करावे, हे आंदोलन गुजराती विरूध्द नाही व सरकार अ आपलेच आहे याचे भान ठेवावे असा मजकूर प्रसिध्द करण्यात आला होता. यानंतर बिंदू चौकात सभा होवून बागलांनी या अहवालाने आमचा विश्वास

.......

घात केलेला आहे. आम्ही महाराष्ट्र मिळविण्यासाठी प्राणपणाने लढत राहू असे मत व्यक्त केले होते.

त्रिराज्य योजना :

शंकरराव देव व प्रांतिक कॉंग्रेसची भूमिका नाकारून केंद्राने ८ नोव्हेंबर १९५५ रोजी त्रिराज्य योजना जाहिर केली. यात गुजरात, महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भाने यात यावे, व मुंबईचे स्वातंत्र राज्य असे तीन राज्य करण्याचे जाहीर केले.

या काळात शंकरराव देव फारसे प्रभावितपणे काम करीत नव्हते. त्रिराज्य योजनेस विरोध करण्यासाठी एस. एम. जोशी, डांगे ठाकरे, बापट यांनी पुढाकार घेवूनच संयुक्त महाराष्ट्र कृती समिती स्थापन केली.

१८ नोव्हेंबर ५५ रोजी मुंबई विधानसभेत त्रिराज्य योजनेचा ठराव मांडण्यात आला. यावर २१ नोव्हेंबर पर्यंत चर्चा करण्यात आली. या काळात समितीने मुंबई विधान भवनावर मोर्चे आणून निदर्शने केली होती. या आंदोलनात १०५ लोक ठार झाले. शेवटी २१ नोव्हेंबर ५५ रोजी कोणताही निर्णय न घेता विधान सभा बेमुदत तहकुब करण्यात आली.

१०५ लोकांचा चळवळीत बळी गेल्यानंतर शंकरराव देवनी संयुक्त महाराष्ट्र कृती समितीचाच निषेध करून ३० जानेवारी ते १० फेब्रुवारी ५६ या अकरा दिवसांत उपोषण केले. नंतर संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे विसर्जनच केले. ६८

......

१ डिसेंबर ५५ रोजी फलटण येथे झालेल्या बैठकीत यशवंतराव चव्हाणांनी आपण नेहरूंच्या सोबत राहू असे जाहीर करून अप्रत्यक्षरित्या त्रिराज्य योजनेस पाठींबा व्यक्त केला. यावेळी नाईक, निंबाळकर, तपासे, लक्ष्मण शास्त्री, जोशी आदी उपस्थित होते. यापुर्वी यशवंतराव नागपूर करार व परिषदेच्या शिष्टमंडळात सहभागी झालेले होते. त्यांनी आपली पूर्वीची भूमिका बदलली होती. [६९]

१६ जानेवारी ५६ रोजी नेहरूंनी मुंबई केंद्र शासित ठेवण्याची घोषणा केली. त्याच्या निषेधार्थ १७ जानेवारी ५६ रोजी कोल्हापूरात बागलांनी सभा घेवून या निर्णयाचा निषेध केला. व पोलीसांनी गोळीबार व लाठमार करताना विचार करून करावा असे आवाहन केले. या आवाहनावर पोलीसात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला म्हणून बागलावर खटला दाखल करण्यात आला. या खटल्याचा निकाल पुढे १२ – ८– ५७ रोजी लागून न्यायालयाने बागलांना निर्दोष मुक्त केले. [७०]

६ फेब्रुवारी ५६ रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक होवून देवांच्या निष्क्रियतेबाबत टिका झाली व लढा चालू ठेवण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली. समितीचे सर चिटणीस म्हणून एस्.एम्. जोशी यांची व बागलासह २७ जनांची सर्व पक्षीय कार्यकारणी निवडण्यात आली. [७१]

संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाल्यानंतर १ मार्च ५६ रोजी राज्यभर सत्याग्रह करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. कोल्हापूरात १६ मार्च ५६ रोजी बागलांनी ५८० लोकासह सत्याग्रह केला होता. [७२]

.....

२८ मे १९५६ रोजी बागलांच्या एकसष्ठी निमित्ताने कोल्हापूरात झालेल्या कार्यक्रमांत एस. एम. जोशी उपस्थित होते. यावेळी बोलताना बागल म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्रासाठीच जगणे व मरणे माझ्या आयुष्याचे कर्तव्य होय. यावेळी जमलेला निधी बागलांनी संयुक्त महाराष्ट्र निधीस अर्पण केला.[७३]

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत बहुसंख्य ब्राह्मण नेते आघाडीवर असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर ब्राह्मणांचे वर्चस्व प्रस्तापित होईल असा अपप्रचार चालला होता. त्यासंबंधीचे पत्रेही बागलांना आली. त्यांनी या आरोपाचे खंडन करणारे एक पत्राक युगांतर मध्ये प्रसिध्द करून आपली भूमिका स्पष्ट मांडली. यात बहुजन समाजाच्या हितासाठी ही चळवळ असून पेशवाई येईल हे म्हणणे मुर्खपणाचे ठरणारे आहे. सत्ता खालच्या समाजाच्या हाती जाण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र होणे गरजेचे आहे. जातीयवादाचे भूत भांडवलदार निर्माण करीत आहेत. त्यापासून महाराष्ट्रीयन जनतेने सावध रहावे असे आवाहन बागलांनी केलेले होते.[७४]

१ ऑगष्ट १९५६ रोजी पुण्यात लोकमान्य टिळकांच्या जन्मशताब्दी निमित्ताने नेहरूंची रेसकोर्स मैदानावर जाहीर सभा झाली. या सभेवर बहिष्कार न घालता समितीने शनिवार वाड्यासमोर त्याच दिवशी सायंकाळी सभा घेतली. या सभेत बोलताना बागलांनी नेहरूवर टिका करून समितीच्या आवाहनास शिवाजी महाराजांची हांक समजून प्रतिसाद द्यावा असे आवाहन केले.[७५]

द्विभाषीक राज्यास मान्यता :
=====================

७ ऑगष्ट १९५६ रोजी संसदेत त्रिराज्य योजनेच्या विधेयकावर चर्चा सुरु झाली. फ्रँक अँन्थोनी व तुळशीदास किलाचंद यांनी द्विभाषिक

.....

महाराज्याची उपसुचना केली. त्यावर विचार होवून ९ ऑगष्ट १९५६ रोजी व्दिभाषिक राज्याचे विधेयक संमत झाले.[७६]

महाराष्ट्र संयुक्त समितीने व्दिभाषीक राज्य फेटाळले. २९ व ३९ सप्टेंबर १९५६ रोजी मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर व्दिभाषीक विरोधी परिषाद घेतली. या परिषादेचे उद्घाटन माधवराव बागल यांच्या हस्ते करण्यांत आले. यावेळी बागलांनी बोली भाषेच्या आधारावर राज्यांची निर्मिती केली तरच जनतेचा सर्वांगिण विकास होवून लोकशाही बळकट करता येईल असे मत व्यक्त करुन शंकरराव देवांच्या बदललेल्या भूमिकेवर टिका केली.[७७]

संसदेत व्दिभाषिक राज्याचे विधेयक संमत झाल्यानंतर ९ ऑक्टोबर १९५६ रोजी मुंबई विधीमंडळात विधेयक संमत झाले. नवे राज्य, नवा नेता या प्रमाणे १६ ऑक्टोबर १९५६ रोजी कॉंग्रेस विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत नेता निवडयात आला. यशवंतराव चव्हाण विरुध्द भाऊसाहेब हिरे अशी लढत होवून यशवंतराव चव्हाण विजयी झाले. १ नोव्हेंबर १९५६ रोजी निर्माण झालेल्या व्दिभाषीक राज्याचे यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री बनले.[७८]

## १९५७ च्या निवडणूका :

व्दिभाषीक राज्य निर्माण झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यातच लोकसभा व विधानसभा निवडणूकांचा कार्यक्रम होता. समितीच्या व कॉंग्रेसच्या दृष्टीने या निवडणूकीला अत्यंत महत्त्व होते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. या संबंधीचा ठराव १० डिसेंबर १९५६ रोजी संमत करुन निवडणूक मंडळाच्या अध्यक्षपदी एस. एम. जोशी यांची निवड करण्यांत

.....

आली. या निवडणूकीत उमेदवार होण्यासंबंधीचा आग्रह माधवराव बागलांना असंख्य नेत्यांनी केला. त्यांनी सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहण्याची आपली भूमिका कायम ठेवून समितीच्या उमेदवारांचा प्रचार करण्याचे मान्य केले. जिल्हा व जिल्हयाबाहेर माधवराव प्रचारासाठी अहोरात्र फिरले. विधानसभा निवडणूकीत समितीचे बहुमत हुकले. कॉंग्रेसला २३२ व समितीला १६० जागा मिळाल्या पण पश्चिम महाराष्ट्रात समितीने १०१ व कॉंग्रेसने ३२ जागा मिळवून समितीने कॉंग्रेसचा दारूण पराभव केला होता. इतर विभागात कॉंग्रेसने आघाडी मिळविल्यामुळे त्यांना बहुमत प्राप्त होवू शकले. समितीच्या नेतृत्वानी त्या भागात आपली असमर्थता दाखविली. कोल्हापूर जिल्हयांत कॉंग्रेसला यावेळी एकही जागा मिळाली नाही. बागलांच्या नेतृत्वाने यात आपली शक्ती पणाला लावून हे यश प्राप्त केलेले होते.[७९]

प्रतापगड मोर्चा :

शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे प्रतापगडावर अनावरण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण व मालोजीराजे निंबाळकर यांनी नेहरूंना आमंत्रित केले होते. राज्यातील कॉंग्रेसची घसरत चाललेली लोकप्रियता पुन्हा सावरण्याचा प्रयत्न सुरू होता. 30 नोव्हेंबर १९५७ रोजी होणाऱ्या या अनावरण समारंभाच्यावेळी शांततामय मार्गाने निदर्शने करण्याचा निर्णय माधवराव बागलांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ५ नोव्हेंबर १९५७ च्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत असा ठराव संमत करण्यात आला की, केंद्रीय मंत्रीमंडळापैकी कांहींनी शिव छत्रपती बाबत अनादराची भावना व्यक्त केली असताना त्यांच्या

.....

पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी नेहरू महाराष्ट्रात येत आहेत. या समारंभाचा मुख्य उद्देश महाराजाबद्दल आदर व्यक्त करणे नसून व्दिभाषीक राज्य मजबूत करणे हा आहे. म्हणून मोर्चा काढून व्दिभाषिक बाबत आपली नापसंती व्यक्त करावी असा समितीचा आदेश आहे.[८०]

## बागल विरोधी अपप्रचार :

कोल्हापूर, पुणे , मुंबई येथील कांही वृत्तपत्रांनी बागल निदर्शने करण्याविरूध्द आहेत असा प्रचार सुरु केला. शहाजी महाराजांनी प्रतापगड समारंभ शांततेने पार पाडावा अशी इच्छा व्यक्त करणारे पत्रक प्रसिध्द केले होते.

यासंबंधी दैनिक प्रभातच्या १० नोव्हेंबर १९५७ च्या अंकात बागलांनी आपला खुलासा करणारे पत्रक प्रसिध्द केले. या पत्रकात ते म्हणतात, शिव स्मारकाला विरोध करण्याची कल्पना आमच्या मनाला असह्य आहे पण स्मारकाच्या आड दडून शिव छत्रपतींचे जीवंत स्मारक (महाराष्ट्र) नष्ट करणा-यांनी प्रथम संयुक्त महाराष्ट्र करावा, महाराजांची बदनामी करणा-या मोरारजींना पदावरून दूर करावे मगच स्मारकाचे उद्घाटन करावे. आम्ही नेहरूंना अथवा कार्यक्रमाज जावू इच्छिणा-यांना अडविण्यास जात नाही तर संयमाने निदर्शने करून आमचे मत मांडणार आहोत.[८१]

३० नोव्हेंबर १९५७ रोजी होणा-या निदर्शनाचा तळ वाईपासून दोन मैलावर होता. स्मारकापासून खूपच अंतर होते. नेहरू बंद गाडीतून जात असताना " मुंबईसह महाराष्ट्र द्या " अशा घोषणा

.....

३०–३५ हजार लोकांनी देऊन मागण्या मांडल्या. यानंतर झालेल्या सभेत एस. एम. जोशी, अत्रे, नाना पाटील, यांची भाषणे झाली. बागलांनी मात्र यावेळी भाषण न करता निदर्शकांकडून शिव नामाचा गजर करून घेतला.[८२]

विनोबांना निवेदन :

विनोबा भावेंची पदयात्रा महाराष्ट्रात मार्च १९५८ मध्ये पोहोचली. त्यांचे व नेहरूंचे संबंध सलोख्याचे आहेत तेंव्हा आपल्या मागण्यांचे निवेदन देवून विनोबांनी संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने अनुकूल बोलावे अशी अपेक्षा बागलांची होती. पण विनोबांनी कसलेही मत व्यक्त करण्यास नकार दिला त्यामुळे बागल नाराज झाले.[८३]

सीमा [illegible] लढा :

फाजल अली समितीच्या अहवालानंतरच संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा जोर वाढत गेला. १९५७ च्या निवडणूकीत कॉंग्रेस हैराण झाली होती. नंतर १ नोव्हेंबर १९५८ पासून कर्नाटकातील मराठी भागात सत्याग्रह करण्याचा व सारावंदी करण्याचा निर्णय समितीने घेतला. या सत्याग्रहात सहभागी होण्याची इच्छा बागलांनी व्यक्त करून १.११.१९५८ रोजी बेळगांव येथे सत्याग्रह केला. यात बागलांना चार महिन्याची शिक्षा होवून मंगळूर कारागृहात रवानगी करण्यांत आली. २५ मार्च ५९ रोजी त्यांची सुटका झाली.[८४]

ऑक्टोबर १९५९ मध्ये द्विभाषीक मुंबई राज्याच्या प्रश्नाचा फेरविचार शांततापूर्ण व सदिच्छेच्या वातावरणात व्हावा अशी इच्छा नेहरूंनी व्यक्त केली होती. यावर बागलांनी नेहरूंच्या सूचनेची समितीने हेटाळणी करू नये व मागच्या त्यांच्या चुका विसरून सहकार्याने प्रश्न सोडवावा असे आवाहन करणारे पत्रक प्रसिध्द केलेले होते.[८५]

.....

शेवटी या लढयाची सांगता मुंबईसह महाराष्ट्र हे मराठी राज्य १ मे १९६० रोजी स्थापन करुन करण्यांत आली.

माधवराव बागल यांचे या चळवळीत बहुजन समाजातील प्रमुख व प्रभावी नेता म्हणून खूपच योगदान आहे. कारण इतर नेत्यांच्या तुलनेत माधवराव बागल सामान्य-जनाशी समरस झालेले व सत्तेची अभिलाषा न ठेवणारे म्हणून ओळखले जात होते. त्यांची शेतकरी कामगार राज्याचे स्वप्न साकार होईल अशी तीव्र इच्छा होती. भाषिक राज्य निर्माण करणे, लोकशाही दृढ करण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे अशी मुलभूत धारणा बागलांची होती. कारण सामान्य जनतेचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी व त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी भाषिक तत्वावर घटक राज्य निर्माण करणे व त्यांच्या भाषिक सांस्कृतिक विकासास चालना देवून राष्ट्र बळकट करण्यास मदत होते. घटक राज्य प्रबळ होत गेले तरच राष्ट्राच्या विकासाची दिशा वेगवान बनते म्हणूनच बागलांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सक्रीय भाग घेतला. द्विभाषिक राज्याच्या रचनेत भांडवलदारांचेच वर्चस्व राजकीय, आर्थिक क्षेत्रात दिसत होते. त्यामुळे मुंबईवरील त्यांची पकड ढिली करुन मुंबई महाराष्ट्राचीच व्हावी या मागणीचा त्यांनी पाठपुरावा केला.

बागलांनी या लढयात अत्यंत समर्थपणे लढवय्या सेनापतीची भूमिका बजावली. संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी वाटेल ती किंमत मोजण्याची जाहीरपणे तयारी दर्शविलेली होती. जनतेचा पाठिंबा हेच त्यांचे मुख्य भांडवल या चळवळीत त्यांच्याकडे होते. शेवटी त्यांना या चळवळीतून मुंबईसह महाराष्ट्र निर्माण करण्याची इच्छा प्राप्त करुन घेण्यात आली. बेळगांवचा प्रश्न मात्र सुटला नाही याची अखेरपर्यन्त त्यांच्या मनात खंत वाटत होती. यासाठीही

.....

त्यांनी नंतरच्या काळात झालेल्या चळवळीत सहभाग केलेला होता. या लढयानंतर काँग्रेसमध्ये असलेल्या चव्हाण, देसाई या बहुजन समाजातील नेत्यांना मदत करण्यासाठी व नेहरूंनी स्विकारलेल्या समाजवादी धोरणांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी त्यांचे नेतृत्व बळकट व्हावे म्हणून काँग्रेसला सहकार्य करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. शेवटच्या घटकेपर्यन्त ते यशवंतराव, इंदिरा गांधी यांचे नेतृत्व मान्य करीत होते. राजकीय भूमिका घेताना देखिल त्यांनी सत्यशोधक विचारांचा धागा व्यवस्थित जोडूनच निर्णय घेतलेला दिसतो.

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=

# संदर्भ सूची

## प्रकरण चौथे

### सत्यशोधक समाज व बागल


| | | |
|---|---|---|
| १) | पाध्ये प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा लोकवाड.मय प्रकाशन मुंबई १९८२ | २0 |
| २) | कीर धनंजय, महात्मा फुले आमच्या सामाजिक क्रांतीचे जनक, पाप्युलर प्रकाशन मुंबई १९७३ | १४४ |
| ३) | उक्त | |
| ४) | कुलकर्णी कृ. गो. लेख - सत्यशोधक समाज महात्मा फुले गौरव ग्रंथ संपादित | ३९0 |
| ५) | कीर धनंजय उपरोल्लिखित | २२३ |
| ६) | पाध्ये प्रभाकर उक्त | २३ |
| ७) | उक्त | २१-२५ |
| ८) | उक्त | |
| ९) | अ) बागल माधवराव अखंड भारत ६ डिसेंबर ४५<br>ब) पाध्ये प्रभाकर उपरोल्लिखित | <br>५५-५९ |
| १0) | बागल माधवराव "सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, प्रकाशन - श्री शाहू सत्यशोधक ग्रंथ प्रकाशक मंडळ कोल्हापूर १९३0 | |
| ११) | उक्त | |
| १२) | बागल माधवराव स्वराज्याचे शत्रू राजारामपूरी कोल्हापूर | ३-५३ |


.....

१३) बागल माधवराव, सत्यशोधाकांना इशारा — १ व ६१३
राजारामपूरी कोल्हापूर

१४) बागल माधावराव जीवन प्रवाह भाग-१ — १०
राजारामपूरी कोल्हापूर १९५४

१५) उक्त — ८९

१६) उक्त — १०३

१७) बागल माधवराव "सामाजिक विचार मंथन" — ३४/३७
अनंत प्रकाशन औरंगाबाद १९८१

१८) बागल माधावराव जीवन संग्राम महाराष्ट्र ग्रंथ
भांडार कोल्हापूर

१९) बागल माधावराव जीवन प्रवाह भाग २ — २९-३०

२०) उक्त — १३९-४०

२१) बागल माधावराव दै. सकाळ दि. २५-१०-३३

२२) बागल माधावराव जीवन प्रवाह भाग २ — १७६-७७
राजारामपूरी कोल्हापूर १९५४

२३) बागल माधावराव जीवन संग्राम महाराष्ट्र ग्रंथ — १८
भांडार कोल्हापूर १९७०

२४) बागल माधावराव संघार्ष-सन्मान — २६-२७-२८
राजारामपूरी कोल्हापूर

२५) अ) फडके य. दि., केशावराव जेधे
श्री विद्या प्रकाशान पुणे १९८२
ब) चव्हाण यशावंतराव, आत्मचरित्रा, (कृष्णाकाठ(खंड पहिला)
प्रेस्टीज पब्लीकेशान पुणे १९८४

२६) फडके य. दि. उक्त — १०

२७) फडके य. दि. उक्त ९०

२८) फडके य. दि. उक्त १०४-५-६

२९) फडके य. दि. उक्त ११७

३०) फडके य. दि. उक्त १२८

३१) फडके य. दि. उक्त १२९

३२) फडके य. दि. उक्त १३४-३६

३३) फडके य. दि. उक्त १३८

३४) फडके य. दि. उक्त १३९

३५) बागल माधवराव हंटर १९३०, कोल्हापूर

३६) बागल माधवराव जीवन प्रवाह - २
राजारामपूरी कोल्हापूर १९५४

३७) बागल माधवराव अखंड भारत ६ डिसेंबर १९४५, कोल्हापूर

३८) बागल माधवराव " सत्याग्रहाकडून सहकार्याकडे १७-१८
राजारामपूरी कोल्हापूर

३९) फडके य. दि. उपरोल्लिखित २०८-९

४०) बागल माधवराव जीवन प्रवाह २ ११४
राजारामपूरी कोल्हापूर १९५४

४१) फडके य. दि. उपरोल्लिखित २१८

४२) उक्त २२८

४३) अ) उक्त २२४
ब) बागल माधवराव जीवन प्रवाह भाग-२ २१२
राजारातपूरी कोल्हापूर

.....

४४) फडके य. दि. उक्त २१६

४५) बागल माधवराव उपरोल्लिखित २२८

४६) फडके य. दि. उक्त २२८-२३८

४७) बागल माधवराव उपरोल्लिखित १८८-८९

४८) बागल माधवराव जीवन प्रवाह -३ २५-२६-२७
राजारामपुरी कोल्हापूर

४९) संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या राज्यपुनर्रचना समितीला
सादर करण्यात आलेल्या अहवालात याचा उल्लेख
करण्यांत आला आहे.

५०) जोशी एस. एम. " मी एस. एम." कॉन्टिनेन्टल १८७
प्रकाशन पुणे १९८४

५१) पेंडसे लालजी " महाराष्ट्र महामंथन ८७
प्र-साहित्य सहकार संघ मुंबई १९६५

५२) उक्त ९२

५३) उक्त ११०

५४) उक्त ११२-१३

५५) उक्त ११५-१६

५६) उक्त ११८

५७) जोशी एस. एम. उपरोल्लिखित १८८

५८) पेंडसे लालजी उपरोल्लिखित ९३

५९) उक्त १६१

६०) उक्त १७०-७१

६१) उक्त १७५

.....

६२) पेंडसे लालजी उपरोल्लिखित २११-२३५

६३) जोशी एस. एम. उपरोल्लिखित १९४

६४) बागल माधवराव जीवन प्रवाह भाग-३ राजारामपूरी कोल्हापूर १२-१३

६५) पेंडसे लालजी उक्त ३०२-३०८

६६) जोशी एस. एम. उपरोल्लिखित ३२०

६७) बागल माधवराव उपरोल्लिखित ३७-३८

६८) जोशी एस. एम. उपरोल्लिखित ३२०

६९) उक्त २०१

७०) बागल माधवराव ५०-५१-१४५-४६

७१) अ) जोशी एस. एम. उपरोल्लिखित २०६
ब) बागल माधवराव उपरोल्लिखित ५५

७२) अ) बागल माधवराव उक्त ५६
ब) पेंडसे लालजी उपरोल्लिखित ५६०

७३) बागल माधवराव उपरोल्लिखित ६५

७४) उक्त ८७

७५) उक्त ८८

७६) जोशी एस. एम. उपरोल्लिखित २१०

७७) बागल माधवराव उपरोल्लिखित १२८-१२९-३०

७८) पेंडसे लालजी उपरोल्लिखित ५३४-३६,४३

७९) अ) बागल माधवराव उपरोल्लिखित १३०-३२-३३
ब) पेंडसे लालजी उपरोल्लिखित ५५६-५६७


.....

| | | |
|---|---|---|
| ८०) | पेंडसे लालजी उक्त | ६०२ |
| ८१) | बागल माधवराव उपरोल्लिखित | १५०–५१ |
| ८२) | उक्त | १६०–६१ |
| ८३) | बागल माधवराव सत्याग्रहातून सहकार्याकडे राजाराममपुरी कोल्हापूर | १०–११ |
| ८४) | उक्त | २९ / ३४ |
| ८५) | उक्त | ५२ |
| ८६) | बागल ज. बा. व बागल च. ज्ञ. (संपादित) राजाराममपुरी कोल्हापूर | विचार संग्रह ६६ |

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=